
महाराष्ट्र शासन
सत्यमेव जयते

# अर्घ्य

## वार्षिकांक २०१६-१७



... वाट एकतेची, उज्वल यशाची ...

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला

# प्रार्थना

ओम्.... भद्रं कर्णेभिः श्रृणुयाम् देवाः ।
भद्रं पश्येमाक्षभिर्य जत्राः।।
स्थिरै रंगैस्तुष्टुवासंस्तनुंभिः।
व्यशेम् देवहितं यदायुः।।

प्रशिक्षणार्थिनः सर्वे । वयमत्र समागतः ।।
स्मरेम् बोधवाक्यन्नः । सा विद्या या विमुक्तये ।।

या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता ।
या वीणावर दण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना ।।
या ब्रम्हाच्युतशंकर प्रभृर्तिभिःदेवैः सदा वंदिता ।
सा मां पातु सरस्वती भगवती निः शेष जाड्या पहा ।।

आता विश्वात्मके देवे, येणें वाग्यज्ञेतोषावे ।
तोषोनि मज द्यावे पसायदान हे ।।

जें खेळांची व्यंकटी सांडो तया सत्कर्मी रती वाढो ।
भूता परस्परे जडो मैत्र जीवांचे ।।
दूरितांचे तिमिर जावो विश्वस्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांछील तो ते लाहो, प्राणीजात ।।

विद्यालय हे मंदिर सुन्दर प्रयाग जणू हे प्रज्ञेचे ।
ज्ञान दिवाळी शोभा उजळी प्रसन्न गृह हे विद्येचे ।।
समता, ममता, त्याग, बंधुता, सेवा गुण हे नित्य स्मरा ।
अमृतत्वाच्या जयजयकारा ज्ञान धनाची कास धरा ।।

समर्पितांचे जीवन जगणे प्रतिभारत हा छंद महा ।
तोचि शिक्षक संस्कृति रक्षक ज्ञानदान ही ज्यास स्पृहा ।।
इये भारती ज्ञानआरती उन्मेषांची अर्घ्यफुले ।
अर्पित सजले विद्यामंदिर मांगल्याची ज्योत जळे ।।

या वेदीवर अज्ञतमाचा अहंपणाचा होम करु ।
स्फूर्तिदीप्तीला प्रेरक ऐषा कृतिने विद्यालय सजवू ।।
भगीरथ होऊ हीच प्रतिज्ञा, चैतन्याचा फुलवू मळा ।
देवि शारदा प्रसन्न होवो, साधकास ह्या तिचा लळा ।।

इथे नित्य व्हावे, सुखी सर्व जीव ।
इथे आयुरारोग्य नांदो सदैव ।।
सदानंद मांगल्य लाहोत सर्व ।
नसो दुःख कोणा, असो शांतीपर्व ।

ओम्... सहानाववतु । सहनौभुनक्तु ।

सहवीर्य करवावहै ।।
तेजस्विना वधीतम्स्तु ।
मा विद्विषावहैं ।
ओम्.. शांतिः शांतिः शांतिः ...।।

# महाविद्यालयाची ध्येय व उद्दिष्टे



SANT GADGE BABA
AMRAVATI UNIVERSITY
AMRAVATI - 444602
(M.S.)

☏ : 2662206, 2662207, 2662208, 2662249, 2662358. FAX NO. 0721-2660949, 2662135
website : www.sgbau.ac.in

No.:SGBAU/8/C-2345/2016.
Date: 29.11.2016

To,
The Principal,
Government College of Education,
Dist.Akola.

**Subject :-** **Permanent Affiliation under section 88 of Maharashtra Universities Act, 1994 regarding.**

Ref'nce:- 1)Your letter Outward No.GCE/Akola/Astha/2015-16/423dated 30/12/2015 .

Sir,

With reference to your letter cited above, it is to inform you that, the Academic Council of Sant Gadge Baba Amravati University, in its meeting held on dated 17/10/2016 vide item no.96 resolved to grant Permanent Affiliation to your college for courses/subjects as mentioned in the following table, from the session 2016-2017 subject to the fulfillment of the conditions as mentioned below :-

Even though your college / Institutions is granted Permanent Affiliation it shall continue to pay annual affiliation fee as prescribed in Direction no. 39/2004, dated 20.10.2004.

| Sr.No. | Course/s | Subject/s |
|---|---|---|
| 1. | B.Ed., | As per syllabus |

Yours faithfully,

Director (BCUD)
Sant Gadge Baba
Amravati University,Amravati.
Amravati University
Amravati

**Copy with compliments to :-**
1.Director of Higher Education, Maharashtra State, Pune-1
2.Joint Director of Higher Education, Amravati ~~University, Amravati~~.
3.Controller of Exam, Sant Gadge Baba Amravati University, Amravati.
4.Finance & Accounts Officer, Sant Gadge Baba Amravati University, Amravati.
5.Director of Student Welfare, Sant Gadge Baba Amravati University, Amravati.
6.Dy.Registrar (Devp.), Sant Gadge Baba Amravati University, Amravati.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला

# अर्घ्य
## वार्षिकांक
## २०१६-१७

प्रेरक व प्रकाशक
डॉ. राजेंद्र भि. मानेकर
प्राचार्य

संपादक
प्रा.डॉ. नीलिमा अ. मोरे
सहाय्यक प्राध्यापक

.... सचिव ....
श्री. श्रीकृष्ण उखर्डा क्षिरसागर
श्री. रोहित पांडुरंग हिवरकर

.... सदस्य ....

श्री. ज्ञानेश्वर नारायण ताले
कु. प्राजक्ता सदाशिव शेळके
कु. बीना सुर्यकांत पाठक
कु. जोत्स्ना मनोहर वाणे

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला

# अर्घ्य

## वार्षिकांक प्रकाशन समिती

२०१६-२०१७

.... अध्यक्ष ....

डॉ. राजेंद्र भि. मानेकर

डॉ. संकेत श्री. राऊत
(ग्रंथपाल)

.... सदस्य....

प्रा. डॉ. नीलिमा अ. मोरे

श्री. अनिल रा. तसरे
(मुख्य लिपीक)

.... प्रशिक्षणार्थी ....

श्री. श्रीकृष्ण उखर्डा क्षिरसागर
(अर्घ्य मंडळ सचिव)

श्री. रोहित पांडुरंग हिवरकर
(अर्घ्य मंडळ सचिव)

.... सदस्य ....

श्री. ज्ञानेश्वर नारायण ताले

कु. बीना सुर्यकांत पाठक

कु. प्राजक्ता सदाशिव शेळके

कु. जोत्स्ना मनोहर वाणे

# अर्पण पत्रिका ....



झाडूने परिसर व किर्तनाने मन साफ करणारे, विज्ञानवादी विचारसरणीला
मुर्त स्वरूपात मांडणारे, वैज्ञानिक दृष्टिकोणाचे धनी
**थोर समाज सुधारक संत गाडगे बाबा**
यांच्या १४२व्या जयंती निमित्त विनंम्रतापूर्वक त्यांच्या चरणी अर्पण करीत आहोत...

# पु.ल. देशपांडे



**एका सुंदर नात्यावर पु.ल. देशपांडे असे लिहीतात :**

मैत्री एक सोपी व्याख्या आहे...
'रोज आठवण यावी असं काही नाही,
रोज भेट व्हावी असं काही नाही,
एवढंच कशाला रोज बोलणं व्हावं
असंही काहीच नाही;
पण मी तुला विसरणार नाही
ही झाली खात्री आणि
तुला याची जाणीव असणं ही झाली मैत्री.'

शेवटी काय हो भेटी नाही झाल्या तरी गाठी
बसणं महत्वाचं. ज्यांनी हे जाणलं त्यांनी
माणसातलं माणूसपण जाणलं....
अशा सगळ्या मित्रांना माझ्या शुभेच्छा.
ही नाती टिकवा आणि आयुष्याचा आनंद घ्या....

# प्राचार्यांचे मनोगत ...




शैक्षणिक सत्र २०१६-१७ चा 'अर्घ्य' वार्षिकांक प्रकाशित करतांना मला विशेष आनंद होत आहे. या महाविद्यालयाच्या प्राचार्य पदाचा कार्यभार दि. २७ जुलै, २०१५ ला मी स्विकारल्यानंतर एन.सी.टी.ई. च्या निकषानुसार विद्यार्थी संख्या कमी झालेली असतांना अनेक आव्हाने स्विकारत महाविद्यालयाची प्रतिष्ठा कायम राहावी व अभ्यासक्रमास अनुसरुन सर्व उपक्रम राबविण्याचा प्रयत्न महाविद्यालय करत आहे व त्याचीच फलश्रुती म्हणजे प्रस्तुत 'अर्घ्य' वार्षिकांक होय.

माझ्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये लेखक, कवी आहेत तसेच चांगले लेख, कविता संकलन करण्याचे सुप्त गुण लपलेले आहेत. त्यामुळे या सुप्त गुणांना व्यक्त होण्यासाठीची एक सुवर्ण संधी 'अर्घ्य' वार्षिकांकामुळे त्यांना प्राप्त करुन दिली. त्याचप्रमाणे त्यांच्या या गुणांचे कौतुक व्हावे व त्यांना अधिक प्रतिभावान होण्याचे दृष्टिने महाविद्यालयाचा हा वार्षिकांक प्रसिध्द करण्याचा उपक्रम होय.

हे महाविद्यालय अध्यापक महाविद्यालय असल्यामुळे इथे आम्ही समाजासाठी लागणारे उत्कृष्ठ शिक्षक घडविण्याचा सुयोग्य प्रयत्न करतो. इतकेच नव्हे तर स्वामी विवेकानंदांनी सांगितल्याप्रमाणे चांगला 'माणूस' कसा घडविता येईल या दृष्टिकोनातुन विचार करतो आणि ते कृतिमध्ये आणण्याचा आमचा सुयोग्य प्रयत्न असतो. म्हणूनच 'अर्घ्य' हा आमच्या महाविद्यालयाचा आरसा होय.

सर्व प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा !

**डॉ. राजेंद्र मि. मानेकर**
प्राचार्य
शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला

# मनोगत



शिक्षणातूनच सर्वांचा सर्वांगिण विकास होऊ शकतो. त्यामुळे पोटाला अर्धी भाकरी खा, पण मुलांना शिकवा. देव प्राप्त करण्यासाठी मंदिरामध्ये जाण्याची, उपास-तापास करण्याची, यज्ञ करण्याची तसेच व्रतवैकल्ये करण्याची गरज नाही. तो दीनदुबळ्यांमध्ये वसलेला आहे. त्यांची सेवा करा, असा विज्ञानवादी दृष्टिकोन असणारे, समाजातील व्यक्तींच्या मनातील घाण, धूळ तसेच समाजातील धुळीची-घाणीची साफसफाई आणि कोणत्याही गोष्टीचा लोभ नसणारे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलितांचे कैवारी भविष्यामध्ये होणार, अशी भविष्यवाणी सांगणारे, ज्यांचे नाव विदर्भातील शिक्षणाचे माहेरघर असलेल्या अमरावती विद्यापीठाला देण्यात आले त्या संत गाडगेबाबांना विनम्र अभिवादन व अर्घ्य वार्षिकांक समर्पित!

शैक्षणिक सत्र २०१६-१७ चा अर्घ्य वार्षिकांक आपणांस सादर करताना अत्यंत हर्ष होत आहे. एन.सी.टी.ई.च्या डिसेंबर २०१४ च्या निर्णयानुसार दोन वर्षांच्या शिक्षण प्रशिक्षण अभ्यासक्रमाची ही दुसरी तुकडी.

एखादे राष्ट्र कोलमडून पडण्यासाठी अणुबॉंब किंवा दीर्घ पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांची गरज नसते. फक्त शिक्षणाचा दर्जा खालावला आणि विद्यार्थ्यांना परीक्षेला स्वतःची फसवणूक करून घ्यायला वाव दिला की, ते राष्ट्र कोलमडून पडायला वेळ लागत नाही. त्यामुळे शिक्षकांवरच राष्ट्रउभारणीची फार मोठी अशी जबाबदारी आहे. म्हणून ही जबाबदारी पेलण्यासाठी उत्कृष्ट शिक्षकांची गरज राष्ट्राला आहे. आणि आमच्या महाविद्यालयातून आम्ही अशाच शिक्षकांची फौज तयार करत आहोत, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

आपण गेल्यानंतरही लोकांनी आपणास विसरू नये असे वाटत असेल, तर दोनपैकी एक काम करावे. एक तर लिहिण्यासारखे काहीतरी काम करावे, नाहीतर मग वाचण्यासाठी काहीतरी लिखाण करावे.

या महाविद्यालयाने या दोन्ही संधी प्रशिक्षणार्थ्यांना उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्यामुळे अर्घ्य वार्षिकांक म्हणजे प्रशिक्षणार्थ्यांच्या भावविश्वाचे प्रतिबिंब, महाविद्यालयीन उपक्रमांचा लेखाजोखा. या वर्षीच्या वार्षिकांकाला मूर्तरूपात साकार करण्याची जबाबदारी अर्घ्य मंडळ सचिव श्री. श्रीकृष्ण क्षिरसागर, श्री. रोहित हिवरकर, कु. विना पाठक, श्रीमती प्राजक्ता शेळके, कु. ज्योत्स्ना वाणे आणि श्री. ज्ञानेश्वर ताले व इतर सदस्यांनी समर्थपणे सांभाळली त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

'अर्घ्य' वार्षिकांक पूर्णत्वास नेण्यासाठी ज्यांचे सहकार्य लाभले त्यामध्ये महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. रा.भि. मानेकर यांची प्रेरणा व मार्गदर्शन महत्त्वपूर्ण आहे. त्याबद्दल मी त्यांच्या प्रति आभार व्यक्त करते. तसेच, प्रकाशन समिती सदस्य ग्रंथपाल डॉ. संकेत राऊत व मुख्य लिपिक श्री. अनिल तसरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले, त्यांचे आभार मानते. तसेच, प्राध्यापक वृंद, कार्यालयीन कर्मचारी, प्रशिक्षणार्थी बंधुभगिनींनी आमच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला त्यांचे आभार मानते. 'अर्घ्य' वार्षिकांकाला सुंदर, आकर्षक रूप देण्याचे काम श्री.अमोल खोलकुटे, अकोला यांनी पार पाडले त्याबद्दल त्यांना मनःपूर्वक धन्यवाद देते!

**भवतु सब्ब मंगलम्**

आपली स्नेहांकित

प्रा. डॉ. नीलिमा अरविंद मोरे

# संपादकीय....



विझलो आज जरी मी
हा माझा अंत नाही....
पेटेन उझ्या नव्याने,
हे सामर्थ्य नाशवंत नाही.....
छाटले जरी पंख माझे,
पुन्हा उडेन मी
अडवू शकेल मला
आजुन अशी एक ही भिंत नाही

प्रत्येकाला लिहीण्याची आवड असतेच तर काहीना दुर्दम्य इच्छाशक्ती असुन सुध्दा बऱ्याचदा त्यांना लिखानाची संधी मिळत नाही अशाच नवयुवकांना लिखनाची संधी मिळावी तसेच त्यांच्या मनातील भावना, विचार इत्यादी ह्या शब्दरुपाने शब्दबध्द व्हाव्या आणि त्यांना लेखनाची प्रेरणा देण्याचा हा आमचा छोटासा प्रामाणिक प्रयत्न. या माध्यमातुन निश्चीतपणे मोठे साहित्यीक घडतील असा आमचा दृढ विश्वास आहे. अश्याच वैखरीच्या वारकऱ्यांना मोकळी वाट करुन देण्याचा हा सकारात्मक प्रयत्न कुठतरी पुर्णत्वास गेला आहे, असं आम्हाला आज वाटत आहे, कारण या अर्घ्य वार्षिकाच्या माध्यमातून अनेकांनी आपल्या मनातील भावविश्व शब्द रुपाने फुलवण्याचा प्रयत्न केलेला आहे. मग ती कवितेच्या माध्यमातून असो की, लेखाख्या माध्यमातून असो. प्रत्येकांला आपआपले पुष्प गुंफण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच काहींनी हास्य विनोदाने या 'अर्घ्य वार्षिकांला' रंजक्ता आणण्याचा केलेला मिश्कीन प्रयत्न हा खरचं कौतुकास्पद आहे.

शासकीय अध्यापक महाविद्यालयाचे ध्येयवेढे व महत्वकांक्षी असलेले छात्रअध्यापक यांना गुरुवर्यांकडुन मार्गदर्शन, मायेची उब, प्रेमाचा ओलावा व पंखाना बळ मिळालं. आमच्या ध्येयसिध्दिची शिदोरी म्हणजे 'अर्घ्य वार्षिकांक' २०१६-१७ ची आवृत्ती आपल्या समक्ष ठेवतांना अत्यंत आनंद होत आहे. ही आवृत्ती वाचकांच्या पसंतीस उतरेल असा दृढ विश्वास आहे.

'अर्घ्य वार्षिकांक' २०१६-१७ सतत आम्हाला प्रेरणा देणारे आमचे प्रेरणा स्थान व आधारस्तंभ प्राचार्य डॉ. राजेंद्र भि. मानेकर सर व अर्घ्य मंडळाच्या मार्गदर्शिका प्रा.डॉ. नीलिमा मोरे यांचे अमुल्य मार्गदर्शन मिळाले तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंदाच्या सहकार्याने व कार्यालयीन कर्मचारी यांच्या सहयोगाने हा वार्षिकांक साकारण्यास मदत झाली तसेच ज्यांच्या अविष्कारातुन हा वार्षिकांक खऱ्या अर्थाने पूर्णत्वास गेला असे ते सर्व छात्रअध्यापक, या सर्वांच्या ऋणात राहुन मी हा 'अर्घ्य वार्षिकांक' २०१६-१७ समस्त वाचकांच्या समक्ष विनम्रता पूर्वक अर्पण करीत आहे.

काटेरी वाट फुलवणारे
अंधारातुन प्रकाशाकडे आम्हास नेणारे
सुख दुःखांत साथ देणारे
आमच्या पंखांना बळ देणारे
सर्व गुरुवर्यांच्या चरणी अर्पण...

**– श्री. रोहित हिवरकर**

# संपादकीय....



जाता जाता आम्हा पाखरांना
थोडा मायेचा हात द्या
भविष्यातच्या यश शिखरांवरील
चातक होण्याची संधी द्या

प्रत्येकाला आपल्या कुवतीप्रमाणे ज्ञानाची तहान असते. जेव्हा ही तहान आपल्या ज्ञानाने तृप्त होते तेव्हा आपले लिखाण उदयात येते. ज्ञान आणि अनुभव यांच्या बळावर जे लिहिल्या जाते त्याला साहित्य असे म्हणावे. याच लिखाणाची आवड प्रत्येकाला असते. फक्त फरक एवढा की कोणाची दिसुन येते तर कोणाची अमुर्तच राहते. याच लिखाणाला मुर्त स्वरुपात आणण्याचं काम आम्ही अर्घ्य या वार्षिकांकाव्दारे आपल्यापर्यंत पोहोचवत आहोत. याबद्दल अत्यंत आनंद होतो.

मनातल्या भावनांना ओठांवर आणले
ओठांवरील भावनांना शब्दांत गुंफले
गुंफीलेल्या शब्दांना कवितेत ओविले
हेच साहित्य तुमच्यासमोर मांडिले

प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या सृजनशीलतेला लेखणीच्या माध्यमातुन आविष्कारीत करण्याची संधी प्राप्त व्हावी या हेतुने अर्घ्य वार्षिकांकाचे प्रयोजन केले. सर्व कलागुणांनी युक्त असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांच्या विचारांना, भावनांना, त्यांच्या मतांना उत्स्फुर्तपणे व्यक्त करण्यासाठी सर्व साहित्य एकत्रित करुन तसेच महाविद्यालयाच्या विविध अंगांची माहिती आपणापर्यंत पोहोचविण्याचे हे एक माध्यम ! त्यांच्या लिखाणाला मिळणाऱ्या व्यासपीठाला लवकरच एक राष्ट्रीय व्यासपीठ मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना ! हीच सदिच्छा !

**– श्री. श्रीकृष्ण क्षिरसागर**

# व्दितीय वर्ष विद्यार्थी संसद



डॉ. राजेंद्र भि. मानेकर, प्राचार्य,
डॉ. अर्चना ग. वातकर, मार्गदर्शक, डॉ. नीलिमा अ. मोरे, श्री. अनिल तसरे, वरिष्ठ लिपीक,
विद्यापीठ प्रतिनिधी : कु. नेहा कर्णे, महिला प्रतिनिधी : कु. आरती जोशी, विद्यार्थी प्रतिनिधी
: कु. नमिता मुळतकर, सांस्कृतिक प्रतिनिधी : श्री. रोहित हिवरकर, क्रीडा प्रतिनिधी : श्री.
श्रीकृष्ण क्षिरसागर, कु. वीना पाठक

# संपादक मंडळ



डॉ. राजेंद्र भि. मानेकर, प्राचार्य,
संपादक : डॉ. नीलिमा अ. मोरे
अर्घ्य मंडळ सचिव : श्री. श्रीकृष्ण क्षिरसागर, श्री. रोहित हिवरकर,
सदस्य : कु. वीना पाठक, श्री. ज्ञानेश्वर ताले, कु. प्राजक्ता शेळके, कु. जोत्स्ना वाणे

# प्रथम वर्ष विद्यार्थी संसद



डॉ. राजेंद्र भि. मानेकर, प्राचार्य,
डॉ. अर्चना ग. वातकर, मार्गदर्शक, डॉ. नीलिमा अ. मोरे, श्री. अनिल तसरे, वरिष्ठ लिपीक,
विद्यापीठ प्रतिनिधी : कु. मानसी देशमुख, महिला प्रतिनिधी : कु. हर्षदा कोरडे, विद्यार्थी
प्रतिनिधी : श्री. वैभव निंबाळकर, सांस्कृतिक प्रतिनिधी : कु. प्रियंका जोशी, क्रीडा प्रतिनिधी :
श्री. मिलींद बावणे, कु. अर्चना धनोकार, प्रसिध्दी प्रमुख : श्री. रोशन वाकोडे



बी.एड. २०१७-२०१९ चे प्रशिक्षणार्थी

# ....... अनुक्रमणिका .......


| अ.क्र. | विवरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | महाविद्यालयाची ध्येय व उद्दिष्ट्ये | I |
| २. | विद्यापीठ ॲफिलेशन लेटर | II |
| ३. | अर्घ्य वार्षिकांक | III |
| ४. | वार्षिकांक प्रकाशन समिती | IV |
| ५. | अर्पण पत्रिका | V |
| ६. | प्राचार्यांचे मनोगत | VII |
| ७. | संपादकीय मनोगत | VIII |
| ८. | संपादकीय | IX |
| ९. | संपादकीय | X |
| १०. | विद्यार्थी संसद (व्दितीय वर्ष) | XI |
| ११. | विद्यार्थी संसद (प्रथम वर्ष) | XII |
| १२. | यशाचे शिल्पकार | XV |
| १३. | यशाचे वाटेकरी | VXI |
| १४. | विविध सल्लागार समिती | XVII |
| १५. | क्षणचित्रे | १-८ |
| १६. | महाविद्यालयाचे प्राविण्यप्राप्त छात्राध्यापक | ९-१२ |
| १७. | मराठी विभाग | १४-२७ |
| १८. | हिंदी विभाग | ३०-३३ |
| १९. | इंग्रजी विभाग | ३६-३८ |
| २०. | अहवाल विभाग | ३९-६३ |
| २१. | प्राध्यापक प्रबोधिनी | ६४-७१ |
| २२. | अशी पाखरे येती | ७३-७४ |

| | | |
|---|---|---|
| अर्घ्य | : | ARGHYA |
| प्रकाशक व मालक | : | (सर्व हक्क सुरक्षित)<br>शासकीय अध्यापक महाविद्यालय,<br>रामदासपेठ, अकोला<br>जि. अकोला (महाराष्ट्र) |
| अक्षर जुळणी<br>व मुद्रण | : | श्री. अमोल खोलकुटे<br>अमोल बाईंडिंग ॲन्ड प्रिंटर्स<br>रणपिसे नगर, अकोला |
| मुखपृष्ठ संकल्पना | : | श्री. श्रीकृष्ण क्षिरसागर<br>श्री. रोहित हिवरकर |
| मुखपृष्ठ शिर्षक | : | श्री. श्रीकृष्ण क्षिरसागर |
| वितरण | : | विनामुल्य |

ह्या अंकातील सर्व लेख व कविता काल्पनिक आहे याचा कुणाच्याही वास्तविक जीवनाशी संबंध नाही. तसेच अंकातील सर्व लेख, कविता, अहवाल हे महाविद्यालय प्रशासकीय यांच्या हक्कात राहतील.

---o---

## यशाचे शिल्पकार....

प्राचार्य : **डॉ. राजेंद्र भि. मानेकर**
एम.एस्सी (प्राणीशास्त्र), एम.एड्.,
पीएच.डी. (शिक्षणशास्त्र), डी. टॅक्स.

प्राध्यापक : **डॉ. सौ. वसुधा विनोद देव**
एम.कॉम. एम.ए. (अर्थ), एम.ए. (मराठी),
विषय संप्रेषण), एम.एड्., पीएच.डी. (शिक्षण),
सेट (शिक्षण), डी.आय.टी.

**डॉ. नूतन भानुदास चव्हाण**
एम.ए. (इतिहस), एम.ए. (भूगोल), एम.एड्.
एम. फिल.(शि.शा.), पीएच.डी.(शि.शा.), सेट (शि.शा.)

**डॉ. आशा मधुकर धारस्कर**
एम.ए. (इति. समाजशास्त्र, मराठी), एम.ए. विषय संप्रेषण
(शिक्षणशास्त्र), एम.एड्., एम. फिल.,
पीएच.डी. (दूरशिक्षण), डी.बी.सी.एम.

**डॉ. सौ. नीलिमा अरविंद मोरे**
बि.ए. (समाजशास्त्र), एम.ए. (विषय संप्रेषण),
एम.एस्सी. (भौतिकशास्त्र), एम.एड्.
पीएच.डी.(शि.शा.), सेट (शि.शा.), डी.एस.एम.

**डॉ. सौ. अर्चना गणेशराव वातकर**
एम.एस्सी. (गणित), एम.एस्सी.(विषय संप्रेषण)
एम.एड्., पीएच.डी. (शि.शा.),

**डॉ.सौ. संध्या उध्दव सामुद्रे**
बी.एस्सी. (गणित), बी.ए. (इंग्रजी वाड्मय),
एम.एस्सी. (विषय संप्रेषण), एम.ए. (समाजशास्त्र),
एम.एड्., पीएच.डी. (शिक्षण)

मनुष्य परिस्थितियों का दास नही, उनका निर्माता है ।
दुसरों के गुण देखें, अपनी कमियाँ दुर करे ।

# यशाचे वाटेकरी

## कार्यालयीन कर्मचारी

| | | |
|---|---|---|
| १) डॉ. संकेत श्रीकृष्ण राऊत | : | प्र. ग्रंथपाल |
| २) श्री. अनिल रावसाहेब तसरे | : | मुख्य लिपिक |
| ३) श्री. रामेश्वर विश्वनाथ वाणे | : | वरिष्ठ लिपिक |
| ४) श्री. गणेश मनोहर पाठक | : | कनिष्ठ लिपिक |
| ६) श्री. राजेश अजाबराव पडोळे | : | प्रयोगशाळा सहाय्यक |

## चतुर्थश्रेणी कर्मचारी

| | | |
|---|---|---|
| १) श्री. प्रमोद गुलाबराव देशमुख | : | शिपाई |
| २) श्री. राजु सुरजदीप यादव | : | शिपाई |
| ३) श्री. अनिल शिवाजी वानखडे | : | शिपाई |
| ४) श्री. गजानन रामकृष्ण ठाकरे | : | शिपाई |
| ५) श्री. रवि अंबुजी ढेनवाल | : | शिपाई |

अच्छी पुस्तके हमारी सच्ची मित्र, शिक्षक, गुरु व मार्गदर्शक है ।
भाग्य पर नही, अपनी श्रेष्ठ कर्मो पर भरोसा रखें।
दृढता ही सफलता की चाबी है ।
नम्र बनेंगे तो सब नमन करेंगे ।

# ॥ विविध सल्लागार समिती ॥

## ग्रंथालय सल्लागार समिती

| | | |
|---|---|---|
| डॉ. राजेंद्र भि. मानेकर | - | अध्यक्ष |
| ग्रंथपाल (रिक्त) | - | स्थानिक सचिव |
| प्रा.डॉ.सौ. वसुधा वि. देव | - | सदस्य |
| प्रा.डॉ. सौ. अर्चना गणेश वातकर | - | सदस्य |
| श्री. अनिल रावसाहेब तसरे | - | कार्यालयीन सदस्य |
| प्रा. डॉ. संकेत श्रीकृष्ण राऊत | - | तासिका तत्त्वावरिल ग्रंथपाल |

## माहिती अधिकारी

डॉ. राजेंद्र भि. मानेकर
(अपिलय माहिती अधिकारी) मो. ८३८००८०२२५

डॉ. वसुधा वि. देव
(माहिती अधिकारी) मो. ९४२२९५९७६४

## महिला तक्रार निवारण समिती

| अ.क्र. | नांव | पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|---|
| १. | डॉ. राजेंद्र भि. मानेकर | प्राचार्य | अध्यक्ष |
| २. | डॉ. आशा अनंत मिरगे | डॉक्टर | अशासकीय सदस्य |
| ३. | प्रा. डॉ. वसुधा विनोद देव | सहाय्यक प्राध्यापक | सदस्य सचिव |
| ४. | प्रा.डॉ. नूतन भानुदास चव्हाण | सहाय्यक प्राध्यापक | सदस्य |
| ५. | प्रा.डॉ. संध्या उध्दव समुद्रे | सहाय्यक प्राध्यापक | सदस्य |
| ६. | श्री. अनिल रावसाहेब तसरे | मुख्यलिपिक | सदस्य |

# क्षणचित्रे .......



सामाजिक उपक्रमांतर्गत मोर्णा स्वच्छता अभियानात जिल्हाधिकारी मा.श्री. अस्तिनकुमार पांडे व उपविभागीय अधिकारी मा.श्री. संजय खडसे तसेच समन्वयिका प्रा. डॉ. आशा धारस्कर व महाविद्यालयाचे छात्राध्यापक



सामाजिक उपक्रमांतर्गत जिल्हा कारागृहाला भेट देण्यात आली. त्यावेळी उपस्थित कारागृह अधिक्षक व महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद तसेच छात्राध्यापक



सामाजिक उपक्रमांतर्गत मोर्णा स्वच्छता अभियानात नदीतील गाळ काढतांना महाविद्यालयाचे छात्राध्यापक



सामाजिक उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील स्वच्छता या उपक्रमात सहभागी छात्राध्यापक व प्राध्यापक वृंद



ज्ञानरचनावादावर आधारीत शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळेत छात्राध्यापकांसोबत कार्यशाळेच्या मार्गदर्शिका डॉ. सीमा मुळे व कार्यशाळा समन्वयिका प्रा. डॉ. संध्या सामुद्रे



ज्ञानरचनावादावर आधारीत शैक्षणिक साहित्य कार्यशाळेत साहित्य बनवताना मग्न छात्राध्यापक



ज्ञानरचनावादावर आधारीत शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळेत छात्राध्यापकांसोबत साहित्याबद्दल चर्चा करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रा.भि. मानेकर



ज्ञानरचनावादावर आधारीत शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळेत छात्राध्यापकांना मार्गदर्शन करतांना डॉ. श्रीकांत उखळकर व समन्वयिका प्रा. डॉ. संध्या सामुद्रे



कार्यानुभव कार्यशाळेत छात्राध्यापकांनी तयार केलेले साहित्य

• कार्यानुभव कार्यशाळेचे उद्घाटन तसेच अवलोकन करतांना प्रमुख पाहुणे मा. प्रा.डॉ. संजय पोहरे





शासकीय अध्यापक महाविद्यालय, यवतमाळ येथे महाविद्यालयातील प्रा.डॉ. सीमा लिंगायत यांची प्राचार्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रा.भि. मानेकर अभिनंदन करतांना सोबत प्रा. डॉ. नीलिमा मोरे

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रा.भि. मानेकर यांच्या वाढदिवस साजरा करतांना महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी





पालक शिक्षक संघ अंतर्गत मुख्याध्यापकांची मुलाखत घेतल्यानंतर सर्व छात्राध्यापक व समन्वयक प्रा. डॉ. आशा धारस्कर



छात्रसेवाकाळ अंतर्गत न्यु इंग्लिश हायस्कुल मध्ये अभ्यासपुरक कार्यक्रम राबविताना छात्राध्यापक



छात्रसेवाकाळ अंतर्गत आयोजित स्पर्धांमध्ये प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना बक्षिस वितरण करतांना महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. अर्चना वातकर



जुबिली इंग्लिश हायस्कुल मध्ये वक्तृत्व स्पर्धेत परिक्षण करतांना महाविद्यालयाचे छात्राध्यापक श्री. रोहित हिवरकर, श्री. ज्ञानेश्वर ताले, श्री. श्रीकृष्ण क्षिरसागर



कार्यानुभव कार्यशाळेत साहित्य बनवताना छात्राध्यापक

ज्ञानरचनावादावर आधारीत शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळेत बनविलेल्या साहित्याचे प्रदर्शनीत सहभागी छात्राध्यापक तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य रा.भि. मानेकर व तज्ञ मार्गदर्शक डॉ. सुभाष पागृत व डॉ. सिमा मुळे





महाविद्यालयीन उपक्रमा अंतर्गत स्वयंस्फुर्त भाषण स्पर्धेमध्ये परीक्षण करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रा.भि. मानेकर, प्रा. डॉ. अर्चना वातकर, प्रा. डॉ. संध्या सामुद्रे व ग्रंथपाल डॉ. संकेत राऊत

राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रा. भि. मानेकर





सर्वसमावेशक शिक्षण विषयांतर्गत मतिमंद शाळेला भेट



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना प्रा. डॉ. वसुधा देव



जुबिली इंग्लिश हायस्कुल मध्ये छात्रसेवाकाळात राबविलेल्या स्पर्धांचे बक्षिस वितरण कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी तसेच मुख्याध्यापक श्री. सुनिल भालेराव व पर्यवेक्षीका जंजाळ (नायर) मॅडम



न्यु इंग्लिश हायस्कुल मध्ये छात्रसेवाकाळातील राबविलेल्या स्पर्धांचे बक्षिस वितरण व समारोपीय कार्यक्रम यामध्ये उपस्थित प्रा. डॉ. संध्या सामुद्रे, प्रा. डॉ. अर्चना वातकर, प्रा. डॉ. निलिमा मोरे, मुख्याध्यापक श्री. माधव मुन्शी, श्री.मिलींद घोगले व स्मिता कुळकर्णी मॅडम



संविधान दिनानिमित्त ग्रंथप्रदर्शनीचे अवलोकन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य रा.भि. मानेकर



जागतिक मराठी राजभाषा दिनानिमित्त लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी या गीताचे गायन करतांना छात्राध्यापक



ज्ञानरचनावादावर आधारीत शैक्षणिक साहित्य निर्मिती मध्ये तज्ञ मार्गदर्शन करताना डॉ. श्रीकांत उखळकर



सर सी.व्ही. रमण यांच्या जयंती निमित्त त्यांच्या जीवनकार्याची माहिती देतांना प्रा. डॉ. नीलिमा मोरे तसेच सर्व प्राध्यापक वृंद व छात्राध्यापक



सामाजिक उपक्रमा अंतर्गत मोर्णा स्वच्छता अभियानात सहभागी छात्राध्यापक तसेच प्राध्याप वृंद व विशेष उपस्थित असलेले मा.ना.श्री. रणजि पाटील, पालक मंत्री, अकोला



महाविद्यालयामध्ये वृक्षारोपन करतांना प्रा. डॉ. नुतन चव्हाण व प्रा.डॉ. नीलिमा मोरे




शालेय अनुबंधा अंतर्गत आदर्श विद्यालयामध्ये मार्गदर्शक प्राध्यापकांची सदिच्छा भेट




अकोला रेल्वेस्थानकावर आलेल्या सायन्स एक्सप्रेसला भेट देतांना महाविद्यालयाचे छात्राध्यापक श्री. रोहित हिवरकर व श्री. श्रीकृष्ण क्षिरसागर

# महाविद्यालयाचे प्राविण्यप्राप्त छात्रअध्यापक



दुसरे राज्यस्तरीय युवा सहित्य संमेलन, दुर्गापूर येथे महा. छात्रध्यापक श्री. रोहित हिवरकर यांच्या 'रीत जगण्याची' या काव्यसंग्रहाचे विमोचन करतांना मराठी सिनेकलाकार चला हवा येऊ द्या फेम श्री. भरत गणेशपुरे व संमेलनाध्यक्ष श्री. किशोर बळी

९१ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन बळोदा, गुजरात येथे कविकट्टा यासाठी महा. छात्रअध्यापक श्री. रोहित हिवरकर यांची 'भारत भुमीवर' या कवितेची निवड करण्यात आली होती. सादरीकरणानंतर सन्मानपत्र स्वीकारतांना श्री. रोहित हिवरकर






मुंबई येथे यीन च्या अधिवेशनात महाराष्ट्र व्यसनमुक्ती महामंडळाच्या राज्याध्यक्ष पदी निवड झालेले महाविद्यालयाचे छात्रअध्यापक श्री. रोहित हिवरकर

महाराष्ट्र कुंभार समाज महासंघ यांच्या वतीने देण्यात येणारा २०१८ चा राज्यस्तरीय युवा साहित्यीक पुरस्कार स्वीकारतांना महाविद्यालयाचे छात्रअध्यापक श्री. रोहित हिवरकर





गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगांव व्दारा अयोजित गांधी विचार संस्कार परिक्षेमध्ये महाविद्यालयाचे छात्राध्यापक श्री. श्रीकृष्ण क्षिरसागर यांनी जिल्ह्यांतुन प्रथम क्रमांक पटकावला त्यानिमित्त त्यांना पदक व प्रशस्तीपत्रक देऊन सत्कार करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रा.भि. मानेकर



पेयजल व स्वच्छता मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या निबंध लेखन स्पर्धेत महा. छात्रअध्यापक श्री. रोहित हिवरकर यांनी जिल्ह्यातून तृतीय क्रमांक पटकावला, त्यानिमित्त त्याचे प्रशस्तीपत्रक देऊन सत्कार करतांना अकोल्याचे उपजिल्हाधिकारी श्री. राजेंद्र खवले



नेहरु युवा केंद्र, अकोला व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत महा. छात्राध्यापक श्री. रोहित हिवरकर यांनी जिल्ह्यातून चतुर्थ क्रमांक पटकावला, त्या निमीत्त प्रशस्तीपत्र स्विकारतांना श्री. रोहित हिवरकर



महाविद्यालयाचे छात्राध्यापक श्री. रोहित हिवरकर यांच्या 'भारत भुमीवर' या कवितेची निवड ९१ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, बळोदा, गुजरात येथे झाल्याने श्री गणेश कला महाविद्यालय, कुंभारी येथे त्यांचा सत्कार करतांना महा. प्राचार्य डॉ. के.व्ही. मेहरे व श्री. शिवाजी कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रामेश्वर भिसे



दै. सकाळ व यीन यांच्या अंतर्गत अकोला, अमरावती, वाशिम, बुलढाणा या चार जिल्ह्यातुन उत्कृष्ठ प्रतिनिधीचा पुरस्कार स्वीकारतांना महाविद्यालयाचे छात्राध्यापक श्री. रोहित हिवरकर



महाविद्यालयाचे छात्राध्यापक श्री. रोहित हिवरकर यांची महाराष्ट्राच्या व्यसनमुक्ती महामंडळाच्या राज्याध्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करतांना अकोला पूर्वचे आमदार श्री. रणधीरजी सावरकर साहेब



क्रीडा अधिकारी कार्यालय, अकोला व क्रीडा व युवक संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या तर्फे आयोजीत निबंध स्पर्धेत महा. छात्रअध्यापक श्री. रोहित हिवरकर यांनी जिल्ह्यातुन व्दितीय क्रमांक पटकावला, त्याबद्दल त्यांचा सत्कार करतांना श्री. खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदिश साबू



शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला येथे यीन निवडणुकीमध्ये श्री. रोहित हिवरकर निवडून आल्या निमित्त त्यांचा सत्कार करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र भि. मानेकर

# विविध स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या छात्राध्यापकांचा सहभा

| अ.क्र. | प्रशिक्षणार्थ्यांची नांवे | उपक्रम | आयोजक |
|---|---|---|---|
| १. | श्री. ज्ञानेश्वर नारायण ताले | वक्तृत्व स्पर्धा | गो.से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, .खामगाव |
| २. | श्री. रोहित हिवरकर<br>श्री. ज्ञानेश्वर ताले<br>श्रीमती ज्योत्स्ना वाने<br>कु. आरती जोशी | राष्ट्रीय एकात्मता व व्यक्तिमत्व विकास या एकदिवसीय युवा शिबिर | स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, श्री रामकृष्ण विवेकानंद सेवा मंडळ, गीता नगर, अकोला |
| ३. | श्री. रोहित हिवरकर<br>श्री. ज्ञानेश्वर ताले<br>कु. आरती जोशी | स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर एकदिवसीय कार्यशाळा | श्री. शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला |
| ४. | श्री. रोहित हिवरकर<br>श्री. श्रीकृष्ण क्षिरसागर | युवा सप्ताहानिमित्त वक्तृत्व स्पर्धा | रामकृष्ण विवेकानंद सेवा मंडळ, अकोला |

# मराठी विभाग

## कसे जगायचे

कोणी कसे ही वागो
मात्र आपण चांगलेच वागायचे
वाईट प्रसंग सोडून
मात्र चांगल्या स्मृती जपायचे

कोणी किती ही खोटं वागत असले तरी
मात्र आपण खरेच वागायचे
जीवनांचा आनंद घेत असताना
मात्र जीवन शिस्तीतचं जगायचे

रिकामा झाला प्रत्येकाचा मनाचा कोपरा
मात्र त्यांचे मन कुठ शोधायचे
पण आपल्या मनाचा शोध घेत असताना
कधी इतरांच्या मनाचे किनारे शोधायचे

बँकेचे कर्ज फेडत असतांना
मात्र समाजाचे ही आपण ऋण फेडायचे
स्वतः जीवन जगत असताना
थोडं इतरांसाठी सुध्दा जगायचे
थोडं इतरांसाठी सुध्दा जगायचे

**स्वरचित**
**श्री. रोहित हिवरकर**

वादळात पत्यांचं घर बनत नाही
रडल्याने बिघडलेले नशीब बनत नाही
जग जिंकण्याची हिम्मत ठेवा
एकदा हरल्याने कुणी फकीर होत नाही
आणि एकदाच जिंकल्याने कुणी सिकंदर होत नाही
लबाडीने जिंकण्यापेक्षा तत्वाने हारलेले बरे,
कुणी विचारले हरला कसा तर सांगेन मी लढलो कसा....

**संकलन - आरती जोशी**

## डॉ. विकास आमटे

आज देवाला सुट्टी आहे
कृपया मंदिरात जाऊ नये,
देव खुप बिझी आहे
त्याला साकड घालू नये ।

जायचंच असेल तर जा एका अनाथाश्रमात,
तो तिथे लहान पोरांना हसवीत आहे,
तुम्हीही हसवा एखाद्या कोमेजलेल्या फुलाला
देवाला आज सुट्टी आहे

तो भेटेल तुम्हाला कुठल्याही हॉस्पिटलात,
प्रेमाने रोग्याला बरा करताना
तुम्ही जा आणि हातभार लावा
मात्र आपली तक्रार सांगू नका कारण
आज देवाला सुट्टी आहे ।

तो दिसेल वृध्दाश्रमात
आजी आजोबांचे डोळे पुसताना
रुमाल घेवून जा तुम्हीही अश्रु पुसण्यासाठी
मात्र आले अश्रु दाखवु नका कारण
आज देवाला सुट्टी आहे ।

तो बसला आहे ट्रॅफिक सिग्नलवर खेळणी
विकणाऱ्या मुलांच्या सुरक्षेसाठी
तुम्ही जा.... जाताच वह्या पुस्तके देऊन त्यांना
सुशिक्षित करा
उगीच पाखंड पुराणासाठी मंदिरातही जा
हवंतर
पण आज देवाला सुट्टी आहे ।
तो बसला आहे अन्नाच्या कणात,
उगीच अन्न वाया घालू नका,
जमेल तर एखादा घास द्या भुकेल्या माणसाला
तो आज त्यांच्यात रमला आहे ।

उगीच मंदिरात जाऊन देवाचा वेळ घालवू नका
त्याला भरपूर काम आहेत,
जमलत तर काही समाजकार्य करा
आज देवाला सुट्टी आहे.... ।

**संकलन - आरती जोशी**

## । निस्वार्थ ।

आजकाल प्रत्येकाला वाटतं
फक्त आपणचं शहाणे
झाल्या जरी हातून चुका
तरी करतात मात्र बहाणे

खरंच जरुरी असतं का
प्रत्येकाला प्रत्येकाने चाचपुन पाहणे
कधी कधी निस्वार्थपणे जीवन
आपले मात्र दुसऱ्यांसाठी वाहणे

खरंच खुप सुंदर असतं
दुसऱ्यांच्या मनात घर करुन राहणे
त्याच्याचं मनात राहुन
मग स्वतःकडे पाहणे

चालता चालता जीवन आपले
कधी समाजाला वाहणे
खरचं खुप कठीण असतं का
सर्व काही वाहुन सुध्दा स्तब्द उभे राहणे
सर्व काही वाहुन सुध्दा स्तब्द उभे राहणे

**स्वरचित – श्री. रोहित हिवरकर**

## जोक

गर्भवती आईने मुलीला विचारले ''काय पाहिजे तुला''...?
मुलगी : भाऊ
आई : कुणासारखा
मुलगी : रावणासारखा
आई : काय ??
मुलगी : बहिणीचा अपमान झाल्याबर राज्य आणि मुत्यू पण देणारा व परस्त्री कैदेत असून पण हात न लावणारा......

**संकलन – आरती जोशी**

## । आई ।

मातृ म्हणा मदर म्हणा
'आई' शब्दात 'जीव' आहे....
पिता म्हणा पप्पा म्हणा,
'बाबा' या शब्दात 'जाणीव' आहे....
सिस्टर म्हणा दीदी म्हणा
'ताई' या शब्दात 'मान' आहे....
ब्रो म्हणा भाई म्हणा
'दादा' शब्दात 'वचक' आहे.....
फ्रेंड म्हणा दोस्त म्हणा
'मित्र' शब्दात 'शान' आहे....
एन्ड म्हणा फिनिश म्हणा
'अंत' शब्दात 'खंत' आहे....
दिवार म्हणा वॉल म्हणा
'भिंत' शब्द 'जिवंत' आहे.....
रिलेशन म्हणा रिश्ता म्हणा
'नातं' शब्दात 'गोडवा' आहे
एनेमी म्हणा दुश्मन म्हणा
'वैर' शब्द जास्त 'कडवा' आहे....
हाय म्हणा हॅलो म्हणा
'हाथ' जोडणे 'संस्कार' आहे
सर म्हणा मॅडम म्हणा
'गुरु' शब्दात 'अर्थ' आहे
ग्रॅंड पॉ ग्रॅंड मॉ शब्दात
काही मजा नाही
'आजी आणि आजोबा'
सारखे सुंदर 'नाते' जगात नाही....
गोष्टी सर्व सारख्या,
पण 'फरक' फार 'अनमोल' आहे
'अ' ते 'श' शब्दात
''ज्ञानाचे भांडार आहे''
म्हणुन इंग्रजी पेक्षा आपल्या ''मराठीत जास्त आदर'' आहे

**संकलन – बीना सुर्यकांत पाठक**

## गुरु असावा असा !

सुर्या सारखा प्रखर जसा ।
चंद्रासारखा शितल जसा ।
पाण्यासारखा निर्मल जसा ।
गुरु असावा असा ।।

आकाशा सारखा अफाट जसा ।
समुद्रासारखा सखोल जसा ।
अग्नि सारखा दाहक जसा ।
गुरु असावा असा ।।

आई सारखा मायाळु जसा ।
सतीसारखा पवित्र जसा ।
भावासारखा प्रेमळ जसा ।
कृष्णासारखा सखा जसा ।
गुरु असावा असा ।।

**संकलन –**
**कु. बिना सुर्यकांत पाठक**

## मुश्किल नही है कुछ दुनिया में

तू जरा हिम्मत तो कर ।
ख्वाब बदलेंगे हकीकत में,
तू जरा कोशिश तो कर।।
आंधिया सदा चलती नही
मुश्किले सदा रहती नही
मिलेगी तुझे मंजिल तेरी
बस तू जरा कोशिश तो कर ।।

**संकलन – आरती जोशी**

## स्त्रीत्वं

मानवतेला जपतोय मी
स्त्री-पुरुष समानतेत जगतोय मी
मानव म्हणून मानवासाठी
स्त्री-पुरुषाचं वेगळेपण जपतोय मी,

कधीकाळी स्त्रीच स्त्रीत्व जपताना
माता, भगिनी, आई, माँ, म्हणायचो मी
बदलत्या काळातील बदलत्या स्त्रीला
मॉम, मम्मी, मदर बोलायला लागलो मी

अत्याचाराचं गाठोड तिच्या दावणीला होतं
नाही नाही म्हणत अन्यायात जगायच होतं
झुगारुन सर्व बंध तिला मुक्त व्हायचं होतं
झुगारुन सर्व बंध तिला मुक्त व्हायचं होतं

**स्वरचित – श्री. श्रीकृष्ण क्षिरसागर**

## नियंत्रण

जगात जिंकता येते सर्व काही
आधी मला जिंकता आल पाहिजे
त्यासाठी आदराने, प्रेमाने, आपुलकीने
फक्त इतरांशी वागता आलं पाहिजे

इतरांना समजावणे खुप सोपे असते
कधी स्वःताला ही समजवता आलं पाहिजे
इतरांना दुःखामध्ये सावरतांना
कधी कधी स्वःताला ही सावरता आल पाहिजे

अरे विसरता येते किती ही मोठे दुःख
फक्त सकारात्मकतेने पाहता आलं पाहिजे
दुःखामध्ये सुध्दा दडलेला असतो आनंद
फक्त दुःखामध्ये ही हसता आले पाहिजे
फक्त दुःखामध्ये ही हसता आले पाहिजे

**स्वरचित – श्री. रोहित हिवरकर**

## ज्ञानगंगा

शिक्षणाची ज्ञानगंगा
सर्वत्र बहायला हवी
खेड्यापाड्यात साक्षर
शोधा तूम्ही वाट नवी ।।१।।

विद्याधनाला जगी मान
निरक्षर साक्षर बनवा
वसा घ्या तुमच्या मनी
सत्य मार्ग हा असे नवा ।।२।।

पवित्र अमृत शिक्षण
प्राशन करा सगळे जण
ध्येय मार्गाची खरी आस
सुखी होईल सर्व जीवन ।।३।।

गुरुचा सर्व मान राखा
कला त्याची वेगळी असे
संगीताचा जीवनात मेळ
ही यशाची वाट असे ।।४।।

**संकलन – पुनम भानुदास लाहोळे**

## माझा देश

हा देश माझा याचे भान जरासे राहू द्या रे
हा उंच हिमालय माझा, हा विशाल सागर माझा
या गंगा, यमुना, शेती, धरती, बाग, बगिचा माझा
अभिलाषा यांची धरिता कोणी नजर वाकडी करता
या मरण द्यावया स्फुरण आपुल्या बाहू पावू द्या रे ।।
जे हात उत्सुकलेले दगडांच्या बर्षावाला
रोखा ते लावा कार्याला, या देशाच्या प्रगतीला
हे बंद करा उत्पाद थांबवा आपल्या घात
सामर्थ्य न जावो व्यर्थ, काहीसा अर्थही येऊ द्या रे।।
जरी अनेक आपुले धर्म, अनेक आपल्या जाती
परी अभंग असुद्या सदैव आपुली माणुसकीची नाती
द्या सर्वदूर ललकारी, फुंका रे एक तुतारी
संदेह रोष जे, व्देष मनातील वाहून जाऊ द्या रे
हा देश माझा याचे भान जरासे राहू द्या रे

**सेनापती बापट**
**संकलन – नमिता प्र. मुळतकर**

## बिकट वाट

तप्त उन्हात मी माझ्या वाटेने निघालो
या नक्षत्रात आता सावलीस ही पोरका झालो
वाट होती माझी बिकट रस्त्यांची
मात्र चटके मात्र भरपूर सोसुन आलो

वाटेमध्ये छळले मला अनेक दुःखांनी
आता काय दुःख नाही मी काय हवहवासा झालो
किती दोष देत बसु मी आता दुःखाला
असे सर्व दुःख मात्र मी गिळुन आलो

अजुन किती दुःख सोसु जीवनाच्या वाटेमध्ये
का दुःखांचा ही मी एवढा लाडका झालो
असो कोणाचाही मी किती ही लाडका मात्र
यशाच्या दिशेने मात्र न थकता मी आता निघालो
मी आता निघालो......

**स्वरचित – श्री. रोहित हिवरकर**

एक सैनिक ने क्या खूब कहा है
किसी गजरे की खुशबू को महकता छोड के
आया हूँ
मेरी नन्ही सी चिडिया को चहकता छोड के
आया हूँ.....
मुझे छाती से अपनी तू लगा लेना ऐ भारत
माँ.....
में अपनी माँ की बाहों को तरसता छोड के
आया हूँ......
जय हिंद

**संकलन– आरती जोशी**

## चार ओळी प्रेरणादायी

आकाशाला गवसणी घालणाऱ्या
गरुडाला पाण्याच्या एका थेंबासाठी
खाली यावे लागते
खाली येणे म्हणजे त्याची
हार नसते तर ती एका उंच
भरारीची सुरुवात असते

उडत्या पाखरांना परतीची तमा नसावी,
नजरेत सदा नवी दिशा असावी.....
घरट्याचे काय आहे
बांधता येईल केव्हाही
क्षितीजाच्याही पलीकडे
झेप
घेण्याची जिद्द असावी

**संकलन – आरती जोशी**

---

## आम्ही सावित्रीच्या ज्योती

आम्ही सावित्रीच्या ज्योती
आम्ही सावित्रीच्या ज्योती
घडवु समाजात शिक्षणक्रांती
देवु मुलींना प्रत्येक क्षेत्रात समानसंधी
आम्ही सावित्रीच्या ज्योती
पेटवुनी मशाली शिक्षणाच्या
बनुनी क्रांतीज्योती देऊ
समाजास ज्ञान, आकलन,
उपाययोजना व स्वावलंबनाची
सक्षम राष्ट्रनिर्माणाची संधी ॥

**स्वरचित – ज्योत्स्ना म. वाणे**

## शिक्षक

तु चुकुन मास्तर झाला
असे अनेक जण मला बोलत असतात
आता शिक्षकाला किंमत काही राहली नाही
असे नेहमी मला सांगत असतात

अरे शिक्षक मात्र शिकवताना
विद्यार्थी किती मन लावून समजून घेत असतात
शिक्षकांनी सांगितलेला शब्द न शब्द
ते लक्ष देऊन ऐकत असतात

त्यांच्या डोक्यामध्ये काहीतरी सुपीक रुजावे
म्हणून विचारांचे बीज मात्र शिक्षकच रोवत असतात
त्यांच्या डोक्याची मशागत आणि
विचारांचे संगोपन मात्र शिक्षकच करत असतात

अरे नसली किंमत तुमच्या मते शिक्षकांना
विद्यार्थ्यांचे समाधान हेच आमच्यासाठी पुरस्कार असतात
मोठे होऊन त्यांनी किर्तीमान उंचवावे
यासाठी मात्र शिक्षकच धडपडत असतात
यासाठी मात्र शिक्षकच धडपडत असतात

**स्वरचित – रोहित हिवरकर**

### जोक

एक कॉलेज विद्यार्थीनी, एकदा क्लासमध्ये लेट आली.
शिक्षक : तु आज लेज का आलीस?
मुलगी : सर, एम मुलगा माझ्या मागे मागे येत होता..
शिक्षक : पण त्यामुळे तर तू लवकर यायला पाहिजे, मग लेट का झालीस
मुलगी : सर तो मुलगा फारच हळू हळू चालत होता....

## बहिण

प्रत्येकाला एक तरी बहीण असावी
जशी मला आहे तशी प्रत्येकाला असावी
मनातले भाव समजुन घेणारी असावी
किमान दोन नाही तर एक तरी असावी

जीवनात येतात अनेक दुःख अडथळे
त्यावेळी धीर देणारी मात्र बहीणच असावी
जीवनात येतात काही क्षण विरहाचे पण
मात्र ते शेअर करायला मात्र बहीणच असावी

नसती बागडायला, खेळायला छोटी
पण समजवायला मात्र मोठीचं असावी
बहिणीच्या मनात असते भावा विषयी अफाट प्रेम
पण प्रत्येक भावाला असं प्रेम करणारी एक तरी
बहीण असावी
...... एक तरी बहीण असावी

**स्वरचित – श्री. रोहित हिवरकर**

## शिक्षकांवर हल्ला

ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकावर
काल रात्री गोळी बार झाला
दोन गोळ्या झाडून मात्र
आरोपी फरार झाला

दरोडेखोरांना रोखले म्हणुन
दोन वर्षाआधी त्याच्यावर हल्ला झाला
का होत आहेत हल्ले त्यांच्यावर
तो काय आतंकवादी झाला

ज्ञानदान करणाऱ्या गुरुच्या वाटेला
कसा प्रसंग आला
हा शिक्षकांवर हल्ला नसून
शिक्षकी पेशावर हल्ला झाला
शिक्षकी पेशावर हल्ला झाला

**स्वरचित –श्री. रोहित हिवरकर**

## कथा

एक तरुण माणूस फार छान्दिष्ट व उधळ्या होत्या. त्याने आपली सगळी मिळकत दारु, जुगार सारख्या व्यसनात घालविली. मग तो दरिद्री होऊन भिकाऱ्यासारखा अरण्यात फिरु लागला. हिवाळ्यात एके दिवशी चांगले कडक उन्ह पडले होते. अशा वेळी तो माणूस नदीकाठी फिरत असता जवळच्या एका आंब्याच्या झाडावर एक कोकिळा बसलेली त्याने पाहिली. कडक उन्ह व कोकिळा पाहून त्याला वाटले की, खरंच उन्हाळा आला व आता पांघरुणाची काही गरज नाही, असा विचार करुन त्याने आपले काही कपडे गहाण ठेवले व पैसे काढून तो आपल्या मित्राबरोबर जुगारला डाव खेळायला गेला. तेथे त्याने सगळे पैसे जुगारात घालविले. संध्याकाळी थंडी पडली; तेव्हा त्याला थंडीमुळे आजारपण आले. उन्हाळा असून असे कसे झाले याचे आश्चर्य करीत तो पुनः नदीवर गेला तर तेथे तो कोकीळ पक्षी थंडीने गारठून झाडाखाली मरुन पडलेला त्याला दिसला. तो प्रकार पाहून तो चांगलाच शुध्दीवर आला व मग त्या पक्ष्याला म्हणाला, 'अरे, मी तुझ्यावर विश्वास ठेवून आपले कपडे गहाण ठेवण्याचा मूर्खपणा केला, तू मला फसवलंस आणि स्वतःचाही नाश करुन घेतलास'.

**तात्पर्य** : व्यसनी माणूस काही वेळा इतका बेसावध असतो की, त्याला सभोवतालच्या गोष्टींचेही भान राहत नाही.

**संकलन – श्री. रोहित हिवरकर**

## अनाथ

अनाथ लेकराचा वाली असते का कोणी
अनाथ म्हटल्यावर साधं ढुंकून ही पाहत नाही कोणी
ज्यांचे आई-वडील नाही, ना त्यांचे नातलग कोणी
ना सख्खे ना चुलत भाऊ बंधू त्यांचे कोणी

साध शिक्षण ही देत नाही हो त्यांना कोणी
शिक्षण देणारा शिक्षक होईल का हो त्यांचा कोणी

अशा अनाथांचा सांगा नाथ होईल का कोणी
मायेने सांगा जवळ घेईल का हो कोणी

प्रेमाचा वर्षाव त्यांच्यावर करेल का हो कोणी
अनर्थावर प्रेम करा प्रेमासाठी अनाथ नाही कोणी

**स्वरचित – श्री. रोहित हिवरकर**

## माझ्या बद्दल

काय सांगु माझ्या बद्दल
मलाच काही कळत नाही
कधी बोलायचं असते बरेच काही
पण बोलणं मात्र जमत नाही

खोटं खोटं हसतांना
रडता मात्र येत नाही
रडता जरी येत नसले
मात्र हसवणे मी काही सोडत नाही

चार शब्द मांडतो
पण समजून कोणी घेत नाही
सांगायला तर भरपूर असते
बोलु कोणी देत नाही
अन भावना समजून कोणी घेत नाही

**स्वरचित – श्री. रोहित हिवरकर**

## कथा

एका माणसाने त्याच्या घरी एक पोपट पाळला होता. पिंजऱ्यात ठेवलेल्या पोपटाला चांगले खायला प्यायला मिळत असे व पोपट बोलका असल्याने घरातील लोकांकडून त्याचे फार कौतुकही केले जाई. पण पोपटाच्या मनात मात्र पारतंत्र्याचे शल्य दाटून येई. अखेर एके दिवशी पोपटाला संधी चालून आली. त्या माणसाने पोपटाला खाणे देण्यासाठी पिंजऱ्याचे दार उघडले होते व त्याच्या हातून ते तसेच उघडे राहिले होते. माणसाला अचानक काही काम आल्याने तो ते दार उघडे टाकून निघून गेला असता पोपट पिंजऱ्याच्या बाहेर निघून गेला. पण लहानपणापासूनच पिंजऱ्यात राहिला असल्याने त्याला फारसे नीट उडताच येत नव्हते. एका झाडावर गेला असता त्याला इतर पोपटांशी बोलता येईना कारण लहानपणापासूनच तो परकी भाषा शिकत असल्याने त्याला पोपटांची भाषा येत नव्हती म्हणून इतर पोपटही त्याला सहकारी मानत नव्हते. पिंजऱ्यात आयते खायची सवय असल्याने त्याला अन्न मिळवणे अवघड जाऊ लागले व ऊन, वारा, पाऊस यांची कधीच सवय नसल्याने तो आजारी पडला व मरुन गेला.

**तात्पर्य :** जास्त काळ पारतंत्र्यात (गुलामगिरीत) राहिल्याने तशीच गुलामगिरीची सवय अंगात मुरुन राहते. मग परक्याची भाषा, संस्कृतीच आपली वाटू लागते आणि मिळालेले स्वातंत्र्य टिकवण्यासाठीची जिद्द अंगी राहत नाही. परक्या संस्कृतीचे चांगले काही घेताना आपल्या संस्कृतीचे विस्मरण होऊ न देणे हाच खरा शहाणपणा.

**स्वरचित – श्री. रोहित हिवरकर**

# हरवलेलं गांव

आधुनिकीकरणाच्या या प्रगत देशात माझं गांव हरवत चाललय. शोधावं तरी कस हेच कळत नाही. नागरीकरणाच्या गतिमान प्रक्रियेत निसर्गाच्या कुशीत वसलेली, भूमीलाच मायबाप मानणारी, शेतीनिष्ठ असलेली गावे हरपायला लागलीत. ज्यांचं बालपण खेड्यात गेलं, त्यांच्या आठवणीत मामाचं गांव अन् बापाचं गांव. मामाचं म्हणजे आईच गांव अन् मामाच्या गावाचं एक वेगळंच आकर्षण मग मामा गरीब असो वा तालेवार. दिवाळीत अन् उन्हाळ्यात खेळण्या बागळण्याची वेगळीच मजा. मला आजपण हे मामाचं पत्र आठवतं आणि जून्या आठवणी नवीन होतात. उन्हाळ्यात आंब्याच्या रसाची मजा आणि दिवाळीत चकल्या करंजाची मजा वेगळीच होती. या सर्वांचा आनंद घेण्यासाठी एक हक्काचं ठिकाण म्हणजे मामाचं गाव. परंतु आता कामाच्या घाईगर्दीत शाळेच्या अतिरिक्त शिकवणी वर्गामुळे या सर्व आठवणी अस्पष्ट होत आहेत. आजही सारेच कधी तरी त्या आठवणीच्या मार्गानं मामाच्या गावाला जातात. गावाला कशी एक वेगळीच छटा होती. बिशालकाय मोठी नदी भरभरुन वाहणारं पात्र. त्या नदीतून बैलाला पोहुन नेणारी बैलगाडी. उंच उंच नदीकाठ फरशीसारखा निळा, काळपट दगड, त्या दगडांचे थर रचून निसर्गानं बांधलेले नदीकाठ. गावात शिरताच एक भल्ली मोठी कमान. दुर वरुन ती कमान दिसली म्हणजे खुप आनंद व्हायचा. कधी आपणं एकदाचं गावात जातो आणि मामाला भेटतो याची आतुरता असायची. गावात गेल्यानंतर तो गावाचा नागमोडी रस्ता. गावाच्या मध्यभागी भला मोठा वड त्याला गोल चोटा आणि त्यावर गावातील वृध्दव्यक्ती गप्पा करतांना थोडं समोर गेलं की चिंचेचं झाड, भला मोठा पार त्यावर मोठं लिंबाच झाड, त्यावर लहान मुलं खेळतांना दिसतात. मामाच्या घरी गेल्याबरोबर मामा स्वागतासाठी तयार असायचे. त्यावेळेस प्रत्येकाची आस्थेने चौकशी करायचे. दिवाळी असेल तर मेनू वेगळा, उन्हाळा असेल तर मेनू वेगळा. उन्हाळ्यात आंब्याचा रस घरात पिकायला टाकलेल्या आंब्याचा वास मनमोहुन टाकायचा आणि पोट भरुन आंबे खायचे. तेव्हा किती ही आंबे खा कुणी रागावणार नाही. थोड वर चढुन गेल तर चुलत मामा, त्याचा गोतावळा सगळ्यांना आम्ही पोरं कशी हवीहवीशी वाटायची.

असचं नदीकाठावर बसलेलं माझं गांव घरच्या खिडकीतून नदीची वेगवेगळी रुप दिसायची. गावातील मारोतीचा पार दर शनिवारी त्यावर दर्शनासाठी असलेली वर्दळ. सकाळचं वर्णन करायचं झाल्यास मन मोहुन टाकणारी सकाळ. पाखरांचा किलबिलाट, चिमण्याची चिवचिव, सकाळचं वातावरण प्रसन्न करणारा वासुदेव ''वासुदेव आला रे वासुदेव आला सकाळच्या पायरी हरीनाम बोला'' हे शब्द जणू आता कानाला ऐकावेसे झाले. या सर्व त्या जुन्या आठवणी तो दारासमोरचा गायीच्या शेणाने टाकलेला सडा, त्यावर काढलेली रांगोळी, आईने सकाळी उठून चुलीवर ठेवलेला चहा. सुर्योदयाच्या आधी शेतावर काम करायला गेलेले मजूर आणि सुर्यास्तानंतर घरी परतुन आलेली गुरेढोरे, बायामाणसे, लेकरे, गायी मागे चालुन चालुन थकुन गेलेलं वासरु जसं थकते तसे थकुन आलेली माणसे. शरीराचा थकवा कमी करण्यासाठी अंगणात बाज टाकुन थोडा थकवा कमी करणयासाठी बाजीवर आराम करत असलेले वडील आणि अंगणात टपोरं चांदण, चांदण्याचा लख्ख प्रकाश. मग मंदीरावर भजनाचा किंवा किर्तनाचा आवाज ऐकूण त्या ठिकाणी जाण्याची गडबड

करणारे वडील, मनाचा थकवा ईश्वराचे नामस्मरण करुनचं मनाचा थकवा कमी होते असे मानणारे आपले वडील आणि नंतर किर्तनातून परतून आल्यावर आपल्या झोपडीचा झोपा पक्का बांधुन घेतल्यानंतर पुन्हा एकदा देवाचं नाम स्मरण करुन झोपी गेले वडील व पुन्हा सकाळी रोजची दैनंदिनी चालु. गावच्या वडाच्या झाडाखाली बसुन गप्पा मारत असलेले म्हातारे आधीच्या रात्रीचे किर्तनाची चर्चा त्या किर्तनातील काही दृष्टांत सांगतात ''कालचा महाराज चांगला होता गड्या त्यानं मस्त सांगितलं महाभारतातली कथा'' असे व्यक्तव्य करणारे आज दिसत नाही.

आज हो या सर्व आठवणी घिरट्या घालतात आपल्या मनाच्या लहरीवर. पण काय फायदा? निसर्गाच्या नकाशावरुन गावंच संपलीत. गावामधये शहरं शिरली, माणसं शिकली हुशार झाली. त्यामुळे गावातील विस्तृत रस्ते हे पायवाटा झाल्या. अतिक्रमणाचा महाभयंकर राक्षस गावात शिरला. गायरान पडीक जमीन गिळकृत केल्या गेली. गावातंल दुध, भाजी, धान्य शहरात गेलं. गावं आता साक्षर झाली, सुशिक्षित झाली पण सुसंस्कृत झाली काय ?

**स्वरचित - श्री. ज्ञानेश्वर नारायण ताले**

---

## प्रेरणादायी कविता

जे शक्य वाटतयं ते स्वप्न मला पहाचय.....!
ज्या शत्रुचा कोणी पराभव करु शकत नाही त्याला मला हरवाचय....!
त्याला मला हरवाचय ....!
कोणालाही सहन होत नाही अस दुःख मला सहन करायच .....!
ज्या ठिकाणी धाडसी माणस जाण्यास धाडस करत नाही त्या ठिकाणी मला जाऊन धावाचयं...!
ज्या वेळी माझे बाहू थकलेत, पाय थकलेत,
हात थकलेत, शरीर थकलय, त्या वेळेस मला
समोर ''एव्हरेस्ट'' दिसतय त्या वेळी मला
माझे एक एक पाऊल त्या ''एव्हरेस्ट'' च्या दिशेने टाकाचयं.....! तो 'स्टार' मला गाठाचाय
मला ''सत्यासाठी'' झगडाचयं, संघर्ष कराचायं....
कुठलाही प्रश्न त्यासाठी विचारायचा नाही
थांबा घ्यायचा नाही.....!
माझी नरकात जायची सुध्दा तयारी आहे
पण त्याला कारण 'स्वर्गीय' असलं पाहिजे .....!

**संकलन - आरती जोशी**

---

Education is gained by steps not by leaps
A man die, Nations may rise and fall, but on idea lives on (Swami Vivekananda)

# जुगार

## आयपीएस अधिकारी विश्वास नागरे पाटील

पहिल्याच दिवशी वर्गामध्ये सरांचे आगमन झाले
ओळखीचे सत्र सुरु करण्यात ओल
तुमचे नाव काय ....?
तुमचे गाव काय ....?
असे प्रश्न विचारण्यात आले ....
कुणाचे बाबा वकील, डॉक्टर, तर कुणाचे
इंजिनियर....
माझा नंबर येताच ....
मी पटकन उभा राहिलो व चटकन सांगितले
''सर, माझे बाबा शेतकरी आहेत''
मी असं म्हणताच सगळा वर्ग
हसायला लागला.....
मला याचा फार राग आला.....
मी म्हटले ''सर मी नाही म्हणत,
या साऱ्यांचा धंदा छोटा हाय,
पण,..... या काळ्या आईची शपथ
सर..... या साऱ्याहून
माझा बाप मोठा हाय ....''
हाडाची काडं करुन रात दिन राबत असतो, तो
राबतो म्हणून तुम्ही आम्ही दिसतो....
काड्याकुड्याचं जिनं त्याचं पण,
साऱ्या जगाला भाकर देतो.....
अन् साऱ्या जगाला भाकर देणारा
कधी कधी उपाशीच झोपतो
माहित नसताना पाऊस येईल-नाही येईल,
हजारो रुपये मातीत गाळतो
खरंच सर तो मातीसंग जुगारच खेळत असतो
सगळे जण जगण्यासाठी जुगार खेळतात
पण,
माझा बाप जगवण्यासाठी जुगार खेळतो, अन्
या जगण्याच्या जुगारीमध्ये तो नेहमीच हरतो
माणुसकीच्या गावामध्ये अजून त्याची वस्ती हाय,
खरंच सर माझ्या बापाची
सरणासंग दोस्ती हाय.....
फाटके तुटके कपडे सर
तो अजूनही अंगावर घालतो..... पण
सर मला तुमच्या कपड्यातही
त्याचाच घामाचा वास येतो
टाकून पहा मातीत सर तुम्ही
पाच-पन्नास हजार, तेव्हाच तुम्हाला कळेल,
त्याच्या जगण्याचा जुगार, म्हणून
म्हणतो सर अभिमान हाय मला
माझा बाप शेतकरी असल्याचा अभिमान आहे मला
मी या शेतकऱ्याचा वारस असल्याचा
जग लिहिते आईसाठी
जग लिहिते साऱ्यांसाठी पण,
मी लिहितो बापासाठी त्याच्याच
जीवनाचा जुगार....''
दारुचा स्टॉक संपत नाही
तंबाखू-शिगरेट चा स्टॉक संपत नाही एवढच काय
तर गुटका बंदी असुनही गुटक्याचा स्टॉक कधी
संपत नाही तर मग ऐण पेरणीच्या दिवसात खता-
बियाण्यांचा स्टॉक कसा काय संपतो....?
आणि वाढीव पैसे देताच लगेच कसा काय उपलब्ध
होतो......
दलाल व्यापाऱ्यांनो पुरे करा हा हरामखोरपणा....
बस करा आता शेतकऱ्यांना लुबाडुन खाणं.....
कारण,
ज्या दिवशी आम्हा शेतकऱ्यांचा अन्नधान्याचा
स्टॉक संपेल ना
तेव्हा तुम्हाला भिकपण मिळणार नाही.

**संकलन - आरती अच्युतराव जोशी**

## जगण्याची रित

इच्छा नाही माझी प्रसिध्दी मिळवण्याची
तुम्ही ओळखता ऐवढचं पुरे आहे मला
नकारात्मक गोष्टीचा विचार मी का करु
ईश्वराने तुमच्या सारखे शुभचिंतक दिलेले आहेत ना मला

किती आले हवे सारखे जवळ माझ्या
आणि न सांगताच सोडुन गेले मला
चांगल्याची चांगले आणि वाईटांनी वाईट
कारण ज्यांना जेवढी गरज होती तेवढेच जाणले मला

सदैव खुश असतो सर्वांना हसवत राहतो
कारण सर्वांची काळजी वाटते मला
जोकर बनुन सदैव हसवण्याचा प्रयत्न करतो मी
पण कधी कधी दुःख ही लपवता येत नाही मला

माहीत आहे किंमत नाही नाही माझी काही
तरी ही आनंद वाटतो जेव्हा शुन्य समजतात मला
जीवन जगण्याची एक रित असते न्यारी
कदाचित तिच ईश्वराने शिकवली आहे मला

प्रत्येक गोष्टीतुन नेहमी चांगलच घ्यावं
कारण हेच नियतीने शिकवल आहे मला
कडु व्यक्तीचा विचार मी कधीच करत नाही
कारण तुमच्या सारखी गोड माणसं मिळाली आहेत मला
कारण तुमच्या सारखी गोड माणसं मिळाली आहेत मला

**स्वरचित - श्री. रोहित हिवरकर**

## साधं सोप आयुष्य

साधं सोपं आयुष्य आहे
साध सोप जगायचं
हसावंस वाटलं तर
बिनधास्त आपलं हसायचं

खेळावसं वाटलं तर
नक्कीच आपण खेळायचं
जास्त ताण न घेता
फक्त मनमोकळ जगायचं

कधी झोप आली तर
बिनधास्त आपलं झोपायचं
पण कामाच्या वेळी मात्र
लवकर आपलं उठायचं

साध सोपं आयुष्य आहे
जास्त किचकट नाही करायचं
हसत, खेळत आपलं
साध सोप जगायचं

हसत, खेळत आपलं
साधा सोप जगायचं....

**स्वरचित - श्री. रोहित हिवरकर**

जो समय को मुल्य देते हैं, वे मूल्यवान बन जाते है ।
जो जीवन को नियमों के अधीन कर लेते है, वे मन से स्वतंत्र रहते है ।
बिना परिश्रम की कोई भी प्राप्ती अस्थाई ही रहती है ।
हमारा आज का एक सत्कर्म कल हमें दुसरे सत्कर्म में प्रेरित करेंगा ।

## जीवनाच्या वाटेवर

जीवनाच्या वाटेमध्ये
काही वार करणारे भेटले
त्यांच्या तीक्ष्ण वाराने मात्र
माझे हृदयचं गाठले

काही कट्टर वैरी तर
काही लोण्याबानी मऊ ही भेटले
शस्त्राचे वार न करता त्यांनी
शब्दांनीच हृदय माझे छाटले

तरी ही प्रेमाचे झरे मी
माझ्या मनामध्ये थाटले
का कुणास ठाऊक त्यांनी
आपआपले रस्ते का नापले

तरी ही न डगमगता पुढे
चालत चालत रस्ते मी गाठले
असे तऱ्हे तऱ्हेचे लोक
मज वाटेमधे भेटले
मज वाटेमधे भेटले

**स्वरचित – श्री. रोहित हिवरकर**

## आईची काळजी

आजच्या इतकी आईपणाची
भिती कधीच वाटली नव्हती
आगीतकतेची असली खंत मनात कधीच दाटली नव्हती
विचालेस आज मला ''आई कोणती वाट धरु?''
गोळा झाले कंठ प्राण आणि डोळे लागले झरु
कोणती दिशा दाखवू मी तुला? पुर्व? पश्चिम? उत्तर? दक्षिण?
माझ्यासारख्याच भितीने या चारी दिशा झाल्या फत्तर
कोठे ज्ञान, यश, सुख? काय त्याच्या खाणाखुणा?
त्या त्या रुपात दिसतो सैतानच वावरतांना
जळी स्थळी आकाशीहि अणुबॉम्ब झाकला आहे
प्रत्येक रस्ता माणसाच्या रक्ताने रे माखला आहे
आज आईच्या कुशीत सुध्दा उरला नाही बाळ निवारा
द्रौणीच्या अस्त्रासारखा हिरोशीमाचा बाधेल वारा
कोठेतरी गेलेच पाहिजे गीताचीही आहेच सक्ती
जायचे कसे त्याची मात्र कुणीच सांगत नाही युक्ती
खचू नको, शोध बाळा तुझा तुच ज्ञानमार्ग
कोणतीही दिशा घे, पण माणुसकीला जाग
धीर धर, उचल पाय, आता मात्र कर घाई
आणखी एक लक्षात ठेव, प्रत्येकालाच असते आई !!

**पद्मजा गोळे,**
**संकलन – नमिता प्रमोद मुळतकर**

---

शिक्षक : सांगा पाहू
विद्यार्थी आणि डॉक्टर यांच्यामध्ये काय साम्य आहे?
हात वर करुन बंड्या सांगतो : 'सर, ओपेरशन झाल्यावर डॉक्टर आणि पेपर झाल्यावर विद्यार्थी एकच सांगतात'
**शिक्षक :** काय ते ?
**बंड्या :** आम्ही आमच्या परीने चांगले प्रयत्न केले

## चारोळी

कपाळावरील रेषेत भाग्य शोधण्यापेक्षा
कपाळावरील घामातच भविष्य शोधल्यास,
आयुष्यात कपाळावर हात टेकविण्याची
तुमच्यावर कधीच वेळ येणार नाही
म्हणून नशिबवादी होण्यापेक्षा प्रयत्नवादी व्हा,
यश तुमची वाट पाहात आहे.....

**संकलन – आरती जोशी**

## एक मैत्रीण असावी.....

एक मैत्रीण असावी....
नेहमी हसणारी आणि हसवणारी
कधी रडणारी आणि रडवणारी
कंटाळा येईपर्यंत बडबडणारी
नाकावर ढिगभर राग असणारी
आपण नसलो की, हिरमुसणारी आणि
दिसली की गालावर छान खळी पाडून हसणारी....
कधी चुकून न बघता पुढे गेली तर
मागून आवाज देणारी,
वेळप्रसंगी आपल्या मित्राची समजुत काढणारी,
वाकडं पाऊल पडतांना मात्र मुस्काटात लावणारी
प्रत्येक गोष्टींवर 'पार्टी' मागणारी
जास्त नाही पण 'चॉकलेट' वर निभावून घेणारी
सगळ्यांच्या घोळक्यात आपल्याला सैरभैर शोधणारी
यशाच्या शिखरावर आपली पाठ थोपटणारी
सुखात मिसळून जाणारी
दुःखात साथ देणारी
कायम पाठिशी खंबीर उभी राहणारी....
खरचं....
अशी एक तरी जीवा भावाची 'मैत्रीण' असावी.....!

**संकलन – कु. स्नेहल छगनराव होनाळे**

## माझी आस

आज दिवस काही असा असावा
मेहनती शिवाय कुठेही पर्याय नसावा

फसवून कोणीही पैसा मिळवेल
पण कष्टाशिवाय मात्र दाम नसावा

उन्हाची तप्त किरणे पाहुन
कुठ तरी विसावा असावा

उपाशी पोटी कोणी ही झोपु नये
सर्वांच्या पोटाला पोटभर आहार असावा

जातीपातीत व धर्मात वाद नसावा
फक्त मानवतेसाठी आपला व्यवहार असावा

कुठेही सिमावादाचा प्रश्न नको मला
सर्वांचा सर्वत्र मुक्त संचार असावा

समाजात कोठेही दुःख व तेढ नको
चहु बाजुंनी सुख शांतीचा झरा असावा
चहु बाजुंनी सुख शांतीचा झरा असावा

**स्वरचित – श्री. रोहित हिवरकर**

रोहितने पहिल्यांदा जोक सांगिला लोक खूप हसले.....
परत त्याने दुसऱ्यांना तोच जोक सांगितला लोककमी हसले ...
परत तिसऱ्यांदा त्याने तोच जोक सांगितला, काहीच लोक हसले..
त्याने वारंवार तोच जोक सांगितला, लोक हसेनासे झाले....
आत त्याने एक महत्वाची गोष्ट लोकांना सांगितली की,
''जर एखाद्या आनंदावर तुम्ही वारंवार आनंदी होऊ शकत नाही तर..
एखाद्या दुखांवर तुम्ही वारंवार दुःखी कसे काय होऊ शकता''

**संकलन – श्री. रोहित हिवरकर**

# आयुष्य

आयुष्य खुप सुंदर आहे
सोबत कुणी नसलं तरी,
एकट्यानेच ते फुलवत रहा,
बादळात सगळं वाहून गेल,
म्हणून रडत बसू नका,
बेगळ अस काही, माझ्यात खास नाही
असं म्हणून उदास होऊ नका

मृगाकडे कस्तुरी आहे,
फुलात गंध आहे,
सागराकडे अथांगता आहे,
माझ्याकडे काय आहे, असं म्हणून रडू नका,
अंधाराला जाळणारा एक सुर्य तुमच्यातही लपला आहे

आव्हान करा त्या सुर्याला!!!
मग उगवेल तो तुमच्या आयुष्यात नवीन क्षितीज घेऊन
अंधारमय रात्र संपवून सोनेरी किरणांनी समजून
मग रोजच उगवेल एक नवी सकाळ
उत्साह ध्येयाने भारुन म्हणून
आयुष्य खूप सुंदर आहे
सोबत कूणी नसलं तरी
एकट्यानेच ते फुलवत रहा....!

**संकलन – कु. स्नेहल छगनराव होनाळे**

## जोक

एकदा मी माझ्या हृदयाला विचालं, 'प्रेम काय आहे?'
हृदयाने क्षणाचाही विलंब न करता पटकन सांगितले,
हे बघ
माझं काम आहे रक्तप्रवाह पाहणं
हे आऊट ऑफ सिल्याबस प्रश्न मला नको विचारु...

## माणुसकीचा झरा

येथे तल्लीन होऊन जगतांना
इतरांसाठी वेळ कुणास आहे
याच ठिकाणी बदलत आहे माणसे
पण भावनेची कदर कुणास आहे

येथे क्षणाक्षणाला नाती गोती
आणि माणुस सुध्दा बदलत आहे
रक्त जरी एकाच रंगाचे असले
तरी माणुसकी हरवत आहे

पैशांच्या या दुनियेत रमताना माणुस
किती भावना शुन्य झाला आहे
ईश्वराने बनवलेल्या मानवी कलाकृतीतून
आता माणुसकीचा झरा आटला आहे
आता माणुसकीचा झरा आटला आहे

**स्वरचित – श्री. रोहित हिवरकर**

## माणुस माणसाला विसरला

जगाच्या पसाऱ्यात माणुस
आज माणासाला विसरला
सोशल मिडीयाच्या मागे लागुन
माणसाचे माणुसपण विसरला

स्वःताचे विश्व मर्यादित केले आणि
स्वतःचाच मळा त्याने फुलवला
नाते गोती विसरुन मात्र
माणुसपणा विसरला

भावना शुन्य तो झाला
# पालक-शिक्षक संघटना कार्यशाळा

बी.एड्. चतुर्थ सत्राच्या प्रशिक्षणार्थींसाठी अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिक कार्याचा एक भाग म्हणून दि. ११ ते १६ व १९ डिसेंबर २०१७ या कालावधीत पालक-शिक्षक संघटना कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. प्रस्तुत कार्यशाळा समन्वयक डॉ. आशा म. धारस्कर (भावसार) यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली.

दि. ११ डिसेंबर १७, सोमवार रोजी डॉ. धारस्कर यांनी विद्यार्थ्यांचे कार्यशाळेसंदर्भात उद्‌बोधन केले. प्रत्येकी १० विद्यार्थ्यांचे ४ गट करून गटानुरूप तात्त्विक, गटकार्य तसेच चर्चा व शाळेला क्षेत्रभेट अशा विविध उपक्रमांचे आयोजन प्रस्तुत कार्यशाळेंतर्गत करण्यात आले. दि. १२ ते १४ डिसेंबर २०१७ या कालावधीत गटकार्य, गटचर्चेचे आयोजन केले गेले. दि. १५ व १६ डिसेंबर २०१७ रोजी प्रशिक्षणार्थींनी अकोला शहरातील न्यू इंग्लिश हायस्कूल व ज्युबिली विद्यालय या प्रथितयश शाळेला क्षेत्रभेट दिली. या क्षेत्रभेटींतर्गत प्रशिक्षणार्थींनी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक यांची मुलाखत घेऊन शाळेत अस्तित्वात असलेल्या पालक-शिक्षक संघटनेविषयी माहितीचे संकलन करून संघटनेच्या स्थापनेपासून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांविषयी तसेच संघटनेच्या कार्यकारिणीविषयी जाणून घेतले.

दि. १९.१२.२०१७ मंगळवार रोजी ज्युबिली विद्यालयात संपन्न झालेल्या पालक-शिक्षक मेळाव्यात विद्यार्थी सहभागी झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी पालकांशी चर्चा केली व पालकांच्या मुलाखती घेतल्या.

प्रस्तुत कार्यशाळेला समन्वयक डॉ. आशा धारस्कर यांचे मार्गदर्शन लाभले.

**मार्गदर्शक प्राध्यापक**

**डॉ. आशा म. धारस्कर - भावसार**

# एन.सी.टी.ई. चर्चासत्र अहवाल

एन.सी.टी.ई. (NCTE) च्या मुल्यांकन पध्दतीनुसार अध्यापक महाविद्यालयांच्या मूल्यमापन प्रक्रियेच्या चर्चेमध्ये शासकीय अध्यापक महाविद्यालयाच्या उपस्थितीचा अहवाल शासकीय अध्यापक महाविद्यालयातून डॉ. नूतन चव्हाण, डॉ. नीलिमा मोरे, श्री. श्रीकृष्ण क्षिरसागर आणि श्री. रोहित हिवरकर यांनी एन.सी.टी.ई. ओपन हाऊस सेशन, मुंबई विद्यापीठ येथे दि. ३.७.२०१८ रोजी उपस्थित राहून सक्रिय सहभाग घेतला.

सदर सभेचे आयोजन डिजीटल ऑडीटोरिअम, कलिना परिसर, मुंबई विद्यापीठ येथे केले गेले. सभेचे नेतृत्व डॉ. संतोष मॅथ्यू, अध्यक्ष एन.सी.टी.ई. यांनी केले. सुरुवातीलाच मा. अध्यक्षांनी परिचय देवून सभेची पार्श्वभूमी स्पष्ट केली. सध्या मूल्यांकन योजना नॅक या संस्थेव्दारे पार पाडली जाते. परंतु नॅक व्दारे २००२ ते २०१७ दरम्यान सुमारे १८००० शिक्षणशास्त्र महाविद्यालयांपैकी फक्त १५२२ संस्थांचेच मूल्यांकन केलेले असल्याचे एन.सी.टी.ई. ने असा निर्णय घेतलेला आहे की नॅकला दिलेला वैधानिक दर्जा काढून घेवून त्या जागी क्वॉलिटी कौन्सील ऑफ इंडिया व्दारा मूल्यांकन केले जाईल आणि नव्याने स्वीकारण्यात येणाऱ्या मूल्यांकन प्रक्रियेची माहिती दिली ती पुढीलप्रमाणे –

- एन.सी.टी.ई. च्या दि: २८.४.२०१७ च्या अधिसूचनेनुसार प्रचलित मूल्यांकन पध्दतीची पाच वर्ष मुदत घटवून दोन वर्ष मुदत घटवून दोन वर्ष करण्यात आली.
- मुल्यांकनाची फी रु. १,५०,०००/- इतकी आहे.
- मुल्यांकनाची माध्यमातून देशभरातून प्रथम १०० संस्थांना मानांकन दिले जाईल.
- प्रत्येक महाविद्यालयाचे गुणांकन १०० गुणांचे असेल – संस्थेचा दर्जा : १० गुण, शैक्षणिक दर्जा २० गुण, शिक्षकांची शिकविण्याची पध्दती ३० गुण (याचा एक तासाचा व्हिडीओ घेतला जाईल) आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता ४० गुण. यात (अ)अभिवृत्ती, कौशल्य व ज्ञान संपादन (ब) शिक्षक पात्रता परीक्षा पास होणे हे दोन मुद्दे प्रामुख्याने विचारात घेतले जाणार आहेत.
- या गुणांकनावरुन अ,ब,क,ड श्रेणी दिली जाईल. ज्या संस्थेला ड श्रेणी प्राप्त होईल ती संस्था बंद केली जाईल. क श्रेणी प्राप्त संस्थेला श्रेणी सुधारण्यासाठी संधी दिली जाईल.
- मुल्यांकन करणारी तपासणी पथके डिसेंबर अखेरपर्यंत काम पुर्ण करतील, मा. अध्यक्षांनी महाराष्ट्रातील शिक्षणशास्त्र संस्थांच्या स्थितीबाबत समाधान व्यक्त करुन महाराष्ट्रातील तपासणी सर्वांत शेवटी करु असे नमुद केले. पथक केव्हाही भेट देईल त्यासाठी दररोज महाविद्यालय, सुसज्ज ठेवावे लागेल, असेही सूचित केले.

तपासणीसाठीची ऑनलाईन नोंदणी (सेल्फ इव्हॅल्यूएशन फॉर्म) दि. १५ जुलै, २०१७ रोजी करायची असून अन्य पूरक दस्ताऐवज नॅशनल टिचर पोर्टल वर दि. २२ जुलै ते १५ ऑगस्ट २०१७ दरम्यान अपलोड करण्याच्या सूचना देण्यांत आलेल्या होत्या.

अशा प्रकारे एन.सी.टी.ई. च्या मुल्यांकन पध्दतीनुसार अध्यापक महाविद्यालयांच्या मूल्यमापन प्रक्रियेच्या चर्चेमध्ये शासकीय अध्यापक महाविद्यालये सक्रिय सहभाग नोंदविला.

**प्रा. डॉ. नूतन चव्हाण**
**प्रा.डॉ. नीलिमा अरविंद मोरे**

# शिक्षणात नाट्य व कला कार्यशाळा अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला अंतर्गत शिक्षणातील नाट्य आणि कला या कार्यशाळेचे आयोजन दि. २७.२.२०१७ ते ११.३.२०१७ या कालावधीमध्ये करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटक म्हणून शा.अ. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मानेकर सर लाभले होते. या कार्यक्रमाच्या समन्वयक प्रा. डॉ. मोरे मॅडम होत्या. तसेच तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून प्रा. श्री. मधुकर जाधव, प्रा. डॉ. उमेश चापके, श्री. अनिरुद्ध दळवी आणि श्रीमती राधिका साठे लाभले होते.

सर्वप्रथम मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर अध्यक्षांनी शिक्षणातील नाट्य आणि कला याविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर कार्यशाळेला सुरुवात झाली. दि. २७.२.२०१७ रोजी प्रा. श्री. मधुकर जाधव यांनी नाट्य म्हणजे काय? नाट्याचे प्रकार, नाट्याचे शैक्षणिक महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर त्यांनी चार गट पाडले. चारही गटांना सामूहिक नाटकासाठी विषय देण्यात आले. त्यामध्ये भावनेवर आधारित आनंद, द्वेष, प्रेम, गोंधळलेली स्थिती हे विषय देऊन प्रशिक्षणार्थ्यांना गटानुसार सामूहिक नाट्य बसविण्यास सांगितले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांनी एकपात्री नाट्य याविषयी माहिती सांगितली व काही प्रशिक्षणार्थींकडून हे प्रात्यक्षिक करून घेतले. तसेच त्यांनी मूकनाट्य, पथनाट्य, एकांकिका यावर आधारित प्रात्यक्षिके करून घेतली. अशाप्रकारे नाट्य या संदर्भात ही कार्यशाळा अतिशय आनंदात उत्साहात उत्स्फूर्तपणे पार पाडली. प्रा. मधुकर जाधव यांनी सलग २८ फेब्रुवारी ते ३ मार्चपर्यंत छात्राध्यापकांना नाट्याविषयी मार्गदर्शन केले.

संगीत प्रात्यक्षिकासाठी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून सीताबाई कला महाविद्यालयाचे डॉ. चापके लाभले होते. त्याविषयी मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, संगीत म्हणजे काय? संगीताचे प्रकार कोणते? संगीत हा शब्द कोठून आला? संगीताचे उद्दिष्ट, संगीताचे जीवनातील महत्त्व, भारतीय संगीत याविषयी अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले.

प्रा. डॉ. चापके सरांनी दि. २८.२.२०१७ ते ३.३.१७ पर्यंत संगीताविषयी मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी छात्राध्यापकांचे चार गट पाडले. प्रत्येक गटाला संगीतासाठी एक विषय देण्यात आला. सर्व प्रथम गट १ ला देशभक्तिपर गीत, गट क्र. २ ला भावगीत, गट क्र. ३ ला आवडीचे गीत, गट क्र. ४ ला मराठी गीत हे विषय देण्यात आले. त्यावर गटचर्चा करण्यासाठी वेळ देण्यात आला. त्यानंतर प्रत्येक प्रशिक्षणार्थीकडून वैयक्तिक गाण्यांचे सादरीकरण करवून घेतले. तसेच सामूहिक गाण्यासाठी वरीलप्रमाणे विषय देण्यात आले. अशाप्रकारे संगीत हे प्रात्यक्षिक अतिशय उत्साहात, आनंदात, उत्स्फूर्त सहभागाने पार पडले.

दिनांक २८.२.२०१७ ते ३.३.१७ रोजी कला आणि तबला या प्रात्यक्षिकासाठी श्री. अनिरुद्ध दळवी सर लाभले होते. यामध्ये त्यांनी रेखांकन, पोस्टर्स कसे तयार करायचे, तसेच तबलावादन याविषयी मार्गदर्शन केले. त्यनंतर त्यांनी चार गट पाडले आणि Be Bold, Be Charge या विषयावर पोस्टर्स तयार करण्यासाठी सुयोग्य मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेमध्ये 'नृत्य' यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शिका म्हणून श्रीमती राधिका साठे यांना आमंत्रित करण्यात आलेले होते. सर्वप्रथम त्यांनी नृत्य म्हणजे काय? नृत्याचा उगम कसा झाला, याविषयी माहिती दिली. त्यानंतर शास्त्रीय नृत्य व लोकनृत्य या दोन नृत्यांच्या प्रकारांविषयी छात्राध्यापकांना सविस्तर माहिती दिली. नृत्य हे फार

पुरातन काळापासून चालत आलेली परंपरा आहे. राजांच्या दरबारी नृत्याला अनन्यसाधारण असे महत्त्व होते. त्यामुळे भारतीय संस्कृतीमध्ये असलेल्या ६४ कला प्रकारांमध्ये नृत्य या कलेला वरचे स्थान प्राप्त झालेले आहे. आपणा सर्वांमध्ये असलेला ताणतणाव निवळण्यासाठी नृत्य हे जालीम औषध आहे तसेच व्यक्तीला जर चिरतारुण्य कायम पाहिजे असेल तर नृत्याची कास धरणे अनिवार्य आहे असे सांगितले. शास्त्रीय नृत्यामध्ये सात नृत्यशैली आहेत. कत्थक, ओडिसी, भरतनाट्यम, मणिपुरी, कुचिपुडी, कथकली, मोहिनीअट्टम असे प्रकार विशद केले. संगीताची उपकरणे याविषयी मार्गदर्शन केले. एवढेच नव्हे, तर प्राथमिक स्तरातील नृत्य छात्राध्यापकांना करून दाखवले. नृत्यामध्ये हावभावांना किती मोठ्या प्रमाणात महत्त्व आहे हे त्यांनी प्रात्यक्षिकाद्वारे स्पष्ट केले. त्यानंतर त्यांनी दुपारच्या सत्रामध्ये छात्राध्यापकांकडून प्रात्यक्षिक करून घेतले.

दि. ९ ते ११ मार्च २०१७ दरम्यान वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. यामध्ये सर्व छात्राध्यापकांना ज्या-ज्या कलांसाठी मार्गदर्शन लाभले होते ती-ती कला छात्राध्यापकांनी वार्षिक स्नेहसंमेलनात सादर केली.

अशाप्रकारे शिक्षणात नाट्य आणि कला ही कार्यशाळा अतिशय आनंदात व उत्साहात पार पडली.

**डॉ. नीलिमा अरविंद मोरे**
प्रभारी व सहा. प्राध्यापक
शिक्षणात नाट्य व कला कार्यशाळा

## कविता

प्रत्येकाला कोणी ना कोणी गुरु असतो. पण माणूस हा आयुष्यभर विद्यार्थी असतो.ही माझी धारणा म्हणून भेटलेल्या प्रत्येक व्यक्तिकडून मग तो लहान असो की मोठा, मी काही तरी चांगले घेण्याचा शिकण्याचा प्रयत्न करीत असतो..... मनातल्या मनात त्यांना गुरु मानतो....
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर टप्प्यावर क्षणा-क्षणावर भेटलेल्या त्या माझ्या असंख्य गुरुंना वंदन !!!!

प्रत्येक दिवसाच्या आठवणी
प्रत्येक दिवस करून जातो
मागे वळून बघत असता
तिथेच तसाच उभा दिसतो
दिवस असेच सरत जातात
ऋतु सारेच घेऊन येतात
वसंतातले कोकीळ कूजन
शिशिरामध्ये गोठवून जातात
वर्ष मात्र संपताना ते
काळजात हुरहुर लावून जाते
सुखद दुःखद आठवणींना
त्याच्या गाठोड्यात बांधून नेत....
तारखा तशाच तिथेच असतात....
आपण मात्र सरत जातो
आठवणींच्या समयांना त्या
काळजामध्ये तेवत ठेवतो



**संकलन - प्राजक्ता शेळके**

# कार्यानुभव कार्यशाळा अहवाल

संत गाडगेबाबा विद्यापीठांतर्गत शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला येथे दि. २२.२.२०१७ ते २५.२.२०१७ या दरम्यान कार्यानुभव कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेच्या समन्वयक व मार्गदर्शक प्रा. डॉ. वसुधा देव यांनी कार्यशाळेचे प्रास्ताविक केले. या कार्यशाळेसाठी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून वाडेकर सर लाभले होते.

उद्घाटन सोहळा पार पडल्यानंतर वाडेकर सरांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करण्यास सुरुवात केली. सकाळच्या सत्रात त्यांनी कार्यानुभवाचे शालेय अभ्यासक्रमातील स्थान तसेच विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून महत्त्व विशद केले.

दुपारच्या सत्रात त्यांनी प्रात्यक्षिकांच्या कृती लेखी स्वरूपात दिल्या. उदा. त्रिकोणी घन, चौकोनी घन, शंखाकृती घन असे अनेक प्रकार आकृतीसहित स्पष्ट करून दिले. अशा पद्धतीने कार्यशाळेचा पहिला दिवस व्यवस्थित पार पडला.

कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी वाडेकर सरांनी सर्वप्रथम प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचे ५ गट तयार केले व त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक कृतीसाठी लागणाऱ्या साहित्याचे वाटप केले. गटानुसार प्रशिक्षणार्थींनी प्रात्यक्षिक कार्य केले. ज्या ठिकाणी प्रशिक्षणार्थींना अडचणी आल्या त्या ठिकाणी वाडेकर सरांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थींना या कार्यशाळेत नवनवीन गोष्टी शिकण्यास मिळाल्या.

अशाप्रकारे शासकीय अध्यापक महाविद्यालयात कार्यानुभव कार्यशाळा आनंदात, उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्या गेली. यातून प्रशिक्षणार्थींना त्यांच्या अध्यापनात उपयोगात आणता येतील अशा अनेक गोष्टी शिकवल्या गेल्या.

ह्या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी मा. प्राचार्य, सर्व प्राध्यापक वृंद, कार्यालयीन कर्मचारी ह्यांचे ऋणनिर्देश.

# बढाई नको रे बाबा

एक माणूस फार वर्षे प्रवास करुन आपल्या घरी आला व आपण परदेशात असतांना काय मौजा पाहिल्या हे त्याने आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना तिखट मीठ लावून सांगितले आणि अगदी शेवटी एक थाप ठोकून दिली की, 'मी अलकावतीला गेलो असता तेथील लोक पंधरा पंधरा हात उंच उड्या मारतात पण त्यांनी माझ्याशी पैज लावली असता माझ्या इतकी उंच उडी एकालाही मारता आली नाही.' ऐकणाऱ्या कोणालाही ही गोष्ट खरी वाटली नाही. तेव्हा त्यांनी खात्री करण्यासाठी तो नाना प्रकारच्या शपथा घेऊन लागला. त्या वेळी त्या लोकातील एक माणूस त्याला म्हणाला, 'अहो, या वेळी तुम्ही अलकावतीला आहात असं समजून तिथे जशी उडी मारली तशी इथं ही मारुन दाखवा म्हणजे झालं. हे ऐकताच त्या बढाईखोर माणसाचे तोंड ताबडतोब बंद झाले.

**तात्पर्य :** आपण प्रवासात पाहिलेल्या गोष्टी फुगवून सांगण्याची काही लोकांना सवय असते, पण एखादेवेळी त्यांचेच बोलणे त्यांच्या गळ्यात येऊन त्यांची फजिती झाल्याशिवाय राहत नाही.

**संकलन – श्री. रोहित हिवरकर**

# सामाजिक उपक्रम अहवाल

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत शिक्षणस्नातक या अभ्यासक्रमातर्गत बी.एड. व्दितीय वर्षाकरिता सामाजिक उपक्र या प्रात्यक्षिका अंतर्गत प्रशिक्षणार्थ्यांना सामाजिक उपक्रमाची जाणीव असावी यासाठी प्रात्यक्षिक राबविण्यात येते. या दृष्टिने या महाविद्यालयामध्ये सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. त्यामध्ये दि. २४.२.२०१८ ते २८.२.२०१८ या दरम्यान विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये विशेषत: मोर्णानदी स्वच्छता मोहीम, महाविद्यालयाची स्वच्छता व कारागृहाला भेट या उपक्रमाची सुरुवात इदि. २४.२.२०१८ ला झाली. त्यामध्ये सकाळी ८ वाजता सर्व प्राध्यापक वृंद व बी.एड. प्रथम वर्षाचे प्रशिक्षणार्थी तसेच व्दितीय वर्षाचे प्रशिक्षणार्थी यांचा सहभाग होता. तसेच प्राध्यापक वृंद सुध्दा सहभागी होते त्यामध्ये प्रा.डॉ. वसुधा देव, प्रा, डॉ. नुतन चव्हाण, प्रा.डॉ. आा धारस्कर, प्रा.डॉ. नीलिमा मोरे, प्रा.डॉ. अर्चना वातकर, प्रा.डॉ. संध्या सामुद्रे या सर्व प्राध्यापकांचे प्रत्येकी १० विद्यार्थी अशी विभागणी करण्यात आली. त्यामध्ये महाविद्यालयाच्या आजुबाजुचा परिसर स्वच्छ करतांना प्लास्टिक कचरा, ओलाकचरा, सुका कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली.

दुसऱ्या दिवशी २६.२.२०१८ रोजी सामाजिक उपक्रमांतर्गत करागृहाला भेट देण्यासाठी त्याची पुर्वतयारी करणे तसेच क्षेत्रभेटीची तयारी आणि त्या घटकाची तात्विक चर्चा करण्यात आली. दि. २८.२.२०१८ रोजी सर्व प्रशिक्षणार्थी व प्राध्यापक वृंद सहभागी होते. सकळी ८ वाजता महाविद्यालयातुन क्षेत्रभेटीला सुरुवात झाली. त्या ठिकाणी गल्यानंतर त्या कैद्यांना शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला तर्फे कारागृह ग्रंथालयासाठी पुस्तके भेट देण्यात आली. सर्व कारागृहाची माहिती प्रशिक्षणार्थीना श्री. मिलींद बन्सोड यांची दिली व सर्व कारागृहाची पाहणी करण्यात आली. त्यानंतर प्रशिक्षणार्थ्यांचा समुह छायाचित्र काढण्यात आली व त्यानंतर दि. २८.२.२०१८ या दिवशी कारागृह भेटी संदभात चर्चा करण्यात आली व त्यानंतर गटचर्चा व्दारा क्षेत्रभेटीची माहिती गोळा करण्यात आली. त्यानंतर कारागृहाच्या संपूर्ण क्षेत्रभेटीचा अहवाल लिखान करण्यात आले व त्याचे सादरीकरण करण्यात आले. अशा प्रकारे सामाजिक उपक्रमांतगत दोन्ही क्षेत्रभेटीचे अनुभव कथन करण्यात आले व समारोप करण्यात आला.

**प्रा. डॉ. आशा धारस्कर**
**समन्वयक**

## भारत भुमीवर

भारताच्या या पावन भुमीवर
गुण्या गोविंदाने नांदतो आम्ही

मानवी व्यवहार, सण उत्सव साजरे करतांना
अनेक सुंदर नाते बांधतो आम्ही

उगाच येते धर्मवाद जातीवादी लहर
मग जात पात धर्मासाठी रक्त सांडतो आम्ही

निती, नियम कायदे ते सर्वांसाठी
मग स्वार्थासाठी का खुंटीवर टांगतो आम्ही

थोर, संत, महात्मे यांची मानवतावादी शिकवण
एका क्षणात विसरुन जातो आम्ही

अशीच चुकीचे गणिते मांडतो कोणी
अन उगाचं उत्तरासाठी रक्त सांडतो आम्ही
अन उगाचं उत्तरासाठी रक्त सांडतो आम्ही

**स्वरचित – श्री. रोहित हिवरकर**

# परीक्षा विभाग अहवाल

परीक्षा हा द्विवर्षीय स्नातक अभ्यासक्रमाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. अभ्यासक्रमात असलेल्या दोन वर्षाच्या कालावधीत एकूण चार सत्रात अभ्यासक्रम विभागलेला आहे. याअंतर्गत घ्याव्या लागणाऱ्या परीक्षाव संबंधित अंतर्गत मूल्यांकनाबाबत वेळोवेळी व व्यवस्थित कार्यवाही होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात 'परीक्षा विभाग' कार्यरत आहे. या परीक्षा विभागाच्या समन्वयक म्हणून प्रा.डॉ. संध्या सामुद्रे या संपूर्ण कार्यभार सांभाळतात.

द्विवर्षीय बी.एड. अभ्यासक्रमात सत्र पद्धती असून, एकूण चार सत्र आहेत. प्रत्येक सत्रामध्ये विषयासाठी गुण व प्रात्यक्षिक गुण निश्चित दिलेले आहेत. प्रत्येक सत्रातील विषयाशी संबंधित आदेशित कार्य, चर्चासत्र, दोन घटक चाचण्या उपक्रम असे सत्र कार्य आहे. या सर्व सत्र कार्य अभ्यासक्रमात दिलेल्या तासानुसार राबविण्यात येते. प्रत्येक विषयाचे चर्चासत्र विद्यार्थ्यांचे समान गटात विभाजन करून नियोजित वेळापत्रक तयार करून त्यानुसार घेतले जातात. प्रत्येक गटात एक गटमार्गदर्शक प्राध्यापक असतात. वेळापत्रकानुसार विद्यार्थी चर्चासत्र सादरीकरण करतात. विद्यार्थ्यांना विषयानुसार आदेशित कार्य दिले जाते. नियोजित वेळापत्रक तयार करून त्यानुसार विद्यार्थ्यांच्या दोन घटक चाचण्या घेतल्या जातात. चर्चासत्रासाठी प्रत्येक विषयाचे प्राध्यापक विद्यार्थ्यांना विविध विषय देतात. त्यानुसार प्रत्येक विद्यार्थी स्वतःच्या विषयाची तयारी करून पद्धतशीर व योग्य सादरीकरण करतात. या सर्व सत्रकार्यासाठी विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते. दिलेल्या वेळेत विद्यार्थी संबंधित कार्य पूर्ण करतात व संबंधित सर्व वह्या जमा करतात. प्रत्येक सत्रात घ्यावयाचे प्रात्यक्षिक कार्य वेगवेगळे दिलेले आहे. दिलेल्या तासानुसार प्रत्येक प्रात्यक्षिकाचे आयोजन संबंधित प्राध्यापक वेळोवेळी करतात. विद्यार्थी प्रात्यक्षिक कार्याचे अहवाल लेखन करून संबंधित प्राध्यापकाकडे वह्या जमा करतात.

परीक्षा विभागांतर्गत सर्व विषयाशी संबंधित सत्र कार्य व प्रात्यक्षिक यांचे आयोजन नियोजित वेळी होण्याच्या दृष्टीने वेळोवेळी सूचना काढल्या जातात. घटक चाचणीचे वेळापत्रक, पर्यवेक्षण वेळापत्रक, सत्र कार्यासंबंधीचे सर्व सूचना सेमिनार सादरीकरण व विद्यार्थी गटविभाजन वेळापत्रक वेळोवेळी तयार करून सर्व कार्य वेळेत पूर्ण केले जाते. विद्यार्थी नियोजित वेळापत्रकानुर व सूचनेनुसार सर्व कार्य वेळेत पार पाडतात.

'अंतर्गत मूल्यांकन' हा बी.एड. अभ्यासक्रमाचा अविभाज्य व महत्त्वाचा घटक आहे. त्यासाठी सत्र-१, सत्र-२, सत्र-३ व सत्र-४ या चारही सत्राशी संबंधित अंतर्गत मूल्यांकन याद्या तयार करून प्राध्यापकांना वितरित केल्या जातात. सर्व प्राध्यापक मूल्यांकन याद्या निर्धारित वेळेत परीक्षा विभागाकडे जमा करतात.

परीक्षा विभागाचे हे संपूर्ण कार्य सातत्याने चालू असते. हे कार्य यशस्वीपणे व सुरळीतपणे होण्यासाठी मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मानेकर व डॉ. वसुधा देव, डॉ. नूतन चव्हाण, डॉ. आशा धारस्कर, डॉ. नीलिमा मोरे, डॉ. अर्चना वातकर या सर्व प्राध्यापकांचे वेळोवेळी सहकार्य व मोलाचे मार्गदर्शन लाभते.

**डॉ. संध्या उद्धव सामुद्रे**
सहा. प्राध्यापक व समन्वयक, परीक्षा विभाग

# योगशिक्षण कार्यशाळा

भारतातील ऐतिहासिक संदर्भानुसार भगवान बुध्द आणि महाविर यांचा काळ जवळ जवळ ३५०० हजार वर्ष प्राचीन आहे. बौध्द आणि जैन दर्शन हे सन्यास आणि मोक्ष दर्शन आहेत. शाक्तयुग सिध्दार्थ, मेघंकल, शरणंकर, दीपंकर, कनकमुनि, कश्यप आणि गौतम आदी २४ बुध्दांनी 'योग' साधनेव्दारे निर्वाण प्राप्त केले. हीनयानी बौध्द ध्यानमार्ग तर महायानी बौध्द अष्टांग योगाची साधना करत होते. जाबात्तोप निषद, योगशिखोपनिषद, अमृत विन्दो पनिषद आदी योगशास्त्रावरील ग्रंथाची निर्मिती याच काळातली.

'योग' हा शब्द 'यज' धातुपासुन बनला असुन त्याचा अर्थ जोडणे एकत्र येणे, असा होतो. मनाला शांत करण्यासाठी जे उपाय केले जातात त्याला योग म्हणतात.

''योगः मनः प्रशमन उपायः ।'' (योग बाशिष्ठ)

योग हा मनाला शांत करण्याचा उपाय आहे.

स्वामी विवेकांनद म्हणतात, ''शारीरिक, मानसिक,बौध्दिक, सामाजिक, भावनिक, अध्यात्मिक असा मानवाचा सर्वांगीण विकास साधणे म्हणजे योग होय''.

म्हणूनच अमरावती विद्यापीठाने बी.एड. अभ्यासक्रमाच्या तृतीय सत्रामध्ये योग शिक्षणाचा समावेश केला आहे. त्यासाठी एकूण ५० गुणांचा समोवश करण्यात आलेला आहे. विशेष म्हणजे ह्या करीता ६० तासांचा कालावधी निश्चित केलेला आहे.

योग शिक्षण विद्यार्थ्यांना देण्यासाठी योगशिक्षकाची आवश्यकता असल्यामुळे शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला येथे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये श्री. अरविंद जोध यांची नियुक्ती करण्यात आली होती.

योगशिक्षणाची कार्यशाळा प्रभारी प्राध्यापक डॉ. नीलिमा मोरे यांनी ६ नोव्हेंबर, २०१७ ते २९ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत महाविद्यालयांत आयोजित केली होती.

दि. ६ नोव्हेंबर, २०१७ ला ११ वाजता योगशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यशाळेमध्ये योगाभ्यास प्रात्यक्षिके, सुक्ष्मव्यायाम, सुर्यनमस्कार योगासने, प्राणायाम, ध्यान आदी यौगीक प्रक्रिया शिकवण्यात आल्या. तात्वीक अभ्यासामध्ये योगशास्त्राचा ईतिहास, अष्टांग योग, यम-नियम, आसन, प्राणायाम, अतंग येग, ध्यानपध्दती आदि विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने डॉ. मनिषा नाईक, कु. सोनल भेंडे, आनंद थत्ते, डॉ. वातकर मॅडम व अरविंद जोध यांनी मार्गदर्शन केले.

योग शिक्षणामुळे छात्राध्यापकांमध्ये सकारात्मक दृष्टिकोनाची रुजवणूक झाली. त्याच प्रकारे योगाचे विविध प्रकार अभ्यासता आले. या कार्यशाळेला यशस्वी करण्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. रा.भि. मानेकर तसेच सर्व प्राध्यापक वृंदाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

**प्रा.डॉ. नीलिमा अरविंद मोरे**
**योग शिक्षक समन्वयक**

---

We can't upload luck
We can't download time
Google can't give all the
answers in life
So just login to reality
and
Enjoy present status of life

**Collected by -**
**Ku. Neha Suresh Wankhade**

# सांस्कृतिक कार्यक्रम अहवाल

## महापरिनिर्वाण दिन

दिनांक : ६.१२.२०१६
स्थळ : शासकीय अध्यापक महाविद्यालस, अकोला

दि. ६ डिसेंबर, २०१६ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला येथे सांस्कृतिक विभागातर्फे विश्वरत्न, राष्ट्रनिर्मिते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी या महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ. रा. भि. मानेकर सर होते. या प्रसंगी बी.एड. च्या छात्र अध्यापकांनी डॉ. आंबेडकरांच्या जीवनाशी निगडीत खालील प्रमाणे प्रकाश टाकला

| | | |
|---|---|---|
| प्रास्ताविक | - | श्री. ज्ञानेश्वर ताले |
| जीवन चरित्र | - | कु. नेहा वानखडे |
| न्याय | - | कु प्राजक्ता शेळके |
| संविधान | - | कु. आरती जोशी |
| एकात्मता | - | कु. सरीता चंदन |
| भाषण, वाचन व लेखन कौशल्य | - | श्री. रोहित हिवरकर |

यानंतर या महाविद्यालयातील प्रा.डॉ. नीलिमा मोरे यांनी डॉ. आंबेडकरांच्या कर्तृत्वावर चर्चा केली. यानंतर या महाविद्यालयाचे मा. प्राचार्य रा.भि. मानेकर सरांनी डॉ आंबेडकरांच्या संपूर्ण जीवनाचा आढावा घेतला आणि अध्यक्षीय भाषण केले. या कार्यक्रमाचे संचलन श्रीमती स्नेहल कर्णे यांनी केलेले असुन आभार प्रदर्शन श्रीमती स्नेहल होनाळे यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राध्यापिका डॉ. वातकर, डॉ. सामुद्रे आणि ग्रंथपाल डॉ. राऊत उपस्थितीत होते.

## संविधान दिन

दिनांक : २२.११.२०१६
स्थळ : शासकीय अध्यापक महाविद्यालस, अकोला

दि. २६ नोव्हेंबर, २०१६ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला येथे व्याख्यान कक्षेमध्ये विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेउकर यांनी लिहिलेल्या संविधानाबद्दल 'संविधान दिन' साजरा करण्यात आला. या दिवशी संविधानाच्या उद्देशिकेचे समूह वाचन ठीक १०.३० बाजता घेण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे आ. प्राचार्य डॉ. रा. भि. मानेकर हे लाभले असून प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ. सीमा लिंगायत ह्या लाभल्या होत्या. डॉ. लिंगायत मॅडम यांनी छात्रअध्यापकांना मार्गदर्शन केले.

ह्या कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री. रोहित हिवरकर व आभार प्रदर्शन कु. प्राजक्ता शेळके यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्रा.डॉ. वसुधा देव, प्रा.डॉ. नीलिमा मोरे, डॉ. सामुद्रे, डॉ. वातकर व सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

ह्या दिवशी आमच्या महाविद्यालयात ग्रंथालयामध्ये उपलब्ध असलेल्या डॉ. आंबेउकर यांच्या जीवनाबरील पुस्तके आणि त्यांनी स्वतः लिहिलेली पुस्तके यांची ग्रंथ प्रदर्शनी भरवण्यात आली. ही प्रदर्शनी ग्रंथालयात भरवण्यात आली. मा. प्राचार्य डॉ. मानेकर सरांच्या हस्ते ह्या प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले व सर्व प्राध्यापक वृंद, कार्यालयीन कर्मचारी व छात्राध्यापकांनी यास भेट दिली व पुस्तके वाचलीत.

अच्छी पुस्तके हमारी सच्ची मित्र, शिक्षक, गुरु व मार्गदर्शक है ।
भाग्य पर नही, अपनी श्रेष्ठ कर्मों पर भरोसा रखें।

## स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ जयंती

दिनांक १०.१.२०१७

स्थळ : शासकीय अध्यापक महाविद्यालस, अकोला

दि. १० जानेवारी, २०१७ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला येथे स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ जयंती आयोजीत करण्यात आली होती. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रा.भि. मानेकर हे होते. व्यासपीठावर कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. नीलिमा मोरे होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांचे हस्ते देवी सरस्वती, स्वामी विवेकानंद व जिजाऊ माता यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर व्यापीठावरील मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमात बी.एड. प्रशिक्षणार्थीनी विवेकानंद व जिजाऊ माता यांच्या विषयी विचार व्यक्त केले. यामध्ये श्री. श्रीकृष्ण क्षिरसागर, श्री. रोहित हिवरकर, ज्योती राऊत, श्री. प्रविण अंभोरे होते. या कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विद्यार्थी प्रतिनिधी श्री. रोहित हिवरकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती ज्योत्स्ना वाणे व आभार प्रदर्शन कु. प्राजक्ता शेळके यांनी केले. कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राध्यापक, डॉ. बसुधा देव, प्रा.डॉ. अर्चना वातकर, प्रा.डॉ. सामुद्रे मॅडम तसेच ग्रंथपाल डॉ. संकत राऊत सर व सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**सांस्कृतिक विभाग**

**प्रा. डॉ. नीलिमा अरविंद मोरे**

## Science Express Visit

दि. २८ जुलै, २०१७ रोजी Science Express Climate Action Special अंतर्गत Science Express Climate Action special Exhibition Train चे आगमन मुर्तिजापूर रेल्वे स्टेशन वुरन अकोला स्टेशनवर झाले. या रेल्वेमधील प्रदर्शनीला भेट देण्यासाठी महाविद्यालयातील सर्व छात्राध्यापक यांनी प्रदर्शनीला भेट दिली. या प्रदर्शनीला वेळ सकाळी १० ते ५.०० पर्यंत होता. या प्रदर्शनीला भेट देण्यासाठी आपल्या नावाची नोंद प्रा.डॉ. नीलिमा मोरे यांच्याकडे नोंदवायची होती. या ट्रेनची सुरुवात ३० ऑक्टोबर २००७ मध्ये भारताचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग व जर्मनीचे चॉन्सलर डॉ. ऐंजेला मार्केल यांनी केली. त्या रेल्वेचा प्रवास १,२२,००० कि.मी. इतका झाला आहे आणि आतापर्यंत १.३३ करोड लोकांनी भेटी दिल्या. त्यामध्ये वातावरणातील बदल, पर्यावरणातील उर्जा, विज्ञानातील विविधता, इत्यादी प्रकारचे विभाग प्रदर्शनामध्ये दिसुन आले.

सर्व छात्राध्यापकांनी त्या विज्ञान प्रदर्शनीच्या रेल्वेला भेटीतुन खुप काही निरीक्षण केले व त्यांना खुप माहिती मिळाली. अशा प्रकारे Science Express ला भेट चांगली झाली.

**सांस्कृतिक विभाग**

**प्रा. डॉ. नीलिमा अरविंद मोरे**

---

Cleanliness is next to godlines

Be kind to with everyone

A wise man gets more use from his enemies than a fool from his friends

Shallow men believe in luck. Strong men belive in cause and effect.

# रक्षा बंधन सोहळा

प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, बिर्ला गेट, अकोला

दि. १२ ऑगस्ट, २०१७ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालयात प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय या अंतर्गत रक्षाबंधनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. ज्ञानेश्वर ताले यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ. अर्चना वातकर व प्रमुख उपस्थिती प्रजा पिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या हर्षा दिदि आणि वर्षा दिदि तसेच या कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक समन्वयक प्रा.डॉ. नीलिमा मोरे यांनी केले. तसेच प्रा.डॉ. वसुधा देव, प्रा. डॉ. नुतन चव्हान, प्रा.डॉ. संध्या सामुद्रे, डॉ. संकेत राऊत आणि महाविद्यालयाचे छात्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी यांची सुध्दा उपस्थिती होती. त्यामध्ये वर्षा दिदि यांनी रक्षाबंधन या दिवसाचे आध्यात्मिक महत्व विद्यार्थ्यांना सांगितले. दिदिंनी सर्व प्रशिक्षणार्थ्यांना राखी बांधुन त्यांना प्रसाद देण्यात आला. अशा प्रकारे संपुर्ण कार्यक्रम चांगला झाला व कार्यक्रमाचा शेवटचा टप्पा आभार प्रदर्शन तर आधार प्रदर्शन कु. स्नेहल होनाळे यांनी केले.

**सांस्कृतिक विभाग**
**प्रा. डॉ. नीलिमा अरविंद मोरे**

# सावित्रीबाई फुले

दि. ३ जानेवारी, २०१७ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयातील व्दितीय वर्षाच्या छात्रध्यापकांनी ह्या कार्यक्रमात सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलन आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस हार अर्पन व पुजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्नेहल वानखडे यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मानेकर सर व प्राध्यापक वृंद प्रा.डॉ. वसुधा देव, प्रा.डॉ. अर्चना वातकर, प्रा.डॉ. संध्या सामुद्रे व प्रा.डॉ. नीलिमा मोरे व या संपुर्ण कार्यक्रमाचे आयोजन संस्कृतिक कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.डॉ.नीलिमा मोरे यांनी केले. तसेच सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश आकण्यासाठी छात्राध्यापकांनी सहभाग नोंदविला. श्री. प्रविण अंभोरे, कु. ज्योती राऊत, श्री. मंगेश सरप, श्री. पवन पाटील, श्री. अनिल मनवर, संदिप बेंद्रे या सर्वांनी आपल्या वकृत्वातून सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचा शेवटचा टप्पा म्हणजे आभार प्रदर्शन, आभार प्रदर्शन कु. कल्पना सावरकर यांनी केले.

**सांस्कृतिक विभाग**
**प्रा. डॉ. नीलिमा अरविंद मोरे**

# सशस्त्र सेना ध्वजदिन

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अकोला सशस्त्र सेना ध्वजदिनानिमित्त निधी संकलनासाठी पत्र पाठविले. त्या अनंषगाने महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक रु. १५०० ते १००० व वर्ग ३ चे कर्मचारी रु. ३००, वर्ग २ चे कर्मचारी रु. ५०० व वर्ग ४ चे कर्मचारी रु. १०० व विद्यार्थी यांच्याकडून रु. १० प्रत्येकी गोळा करण्यात आले. त्याची सर्व निधी स्विकारण्याची जबाबदारी महाविद्यालयाच्या प्राध्यापिका प्रा.डॉ. नीलिमा अ. मोरे यांनी स्विकारली. महाविद्यालयातुन संपुर्ण रक्कम एकूण रु. ७५६० दि. ५.१२.२०१६ ला जमा करण्यात आली आणि हा सर्व निधी जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करण्यात आला. अशा प्रकारे भारताच्या सशस्त्र सेना ध्वजदिना निमित्त सीमेवर लढणाऱ्या सैनिकांना मदत म्हणुन महाविद्यालयातुन निधी जमा केला.

**सांस्कृतिक विभाग**
**प्रा. डॉ. नीलिमा अरविंद मोरे**

# प्राध्यापक प्रबोधिनी

महात्मा ज्योतीबा फुले यांनी शिक्षणाची महती खालील प्रमाणे सांगितली आहे.

**विद्येविना मति गेली, मतीविना नीती गेली,**
**नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले,**
**वित्त विना शुद्र खाले,**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले.**

त्यांच्याच खांद्याला खांदा लावून समस्त स्त्री जातीच्या शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी सुध्दा

**''विद्येविन गेले वाया सारे पशू**
**स्वस्थ नका बसू विद्या घेण्या!''**

विद्येची म्हणजेच शिक्षणाची महती सांगितली आहे.

असे हे शिक्षण गुरुविना/शिक्षणाविना शक्य नाही. त्यामुळे निक्षकांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे. शिक्षक हा/ही मार्गदर्शक, सहाय्यक व मार्गदर्शक म्हणून सुध्दा कार्य करीत असतो.

शिक्षक हा/ही ज्ञाननिष्ठ, विद्यार्थीनिष्ठ व समाजनिष्ठ असणे आवश्यक आहे.

गुरुदेव रविंद्रनाथ टागोरांच्या मते ''A lamp can never light another lamp unless it continues to burn its own flame''

म्हणूनच शिक्षकाला अद्यावत राहणे गरजेचे आहे. शासकीय अध्यापक हे एक महाविद्यालय असल्यामुळे येथील शिक्षकांना आपल्याला प्राध्यापक म्हणूनच संबोधावे लागेल. या प्राध्यापकांना सुध्दा व्यावसायिक गुणवत्ता, नैपुण्य प्राप्त करावे लागते. तसेच व्यावसायिक विकासातंर्गत प्रकाशने, सहभाग आणि सादरीकरण करणे गरजचे असते. या सर्व बाबींच्या पुर्ततेसाठीची परवानगी आणि प्रोत्साहन या महाविद्यालयाचे आदरनीय प्राचार्य डॉ. राजेंद्र भि. मानेकर हे नेहमीच अग्रेसर असतात. यालाच आपण 'प्राध्यापक प्रबोधिनी' असे म्हणतो. याची उद्दिष्ये खालील प्रमाणे आहेत.

उद्दिष्टे :

१. प्राचार्य, अधिव्याख्याता यांच्या शैक्षणिक, व्यावसायिक गुणवत्ता वाढीस प्रेरणा देणे.
२. शैक्षणिक व सामाजिक नियतकालिके, मासिके, वृत्तपत्रे या व्दारे विविध विषयांवरील लिखाण प्रकाशीत करण्यास प्रोत्साहन देणे.
३. महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांचा सामाजिक व सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील सहभाग वाढविणे.
४. शैक्षणिक परिषद, चर्चासत्र, कृतिसत्र, इत्यार्दीमध्ये शोधनिबंध सादर करणे.
५. व्यावसायिक उद्‌बोधन वर्ग, उजळणी वर्ग, इत्यार्दी चा लाभ घेवून व्यावसायिक विकास करणे.
६. मा. प्राचार्य, अधिव्याख्याता इत्यादींच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेवून त्यांचा गौरव करणे.

**डॉ. राजेंद्र भि. मानेकर, प्राचार्य**

१. मानद संचालक, बी.एड. अभ्यासक्रम, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
२. सदस्य, अभ्यास मंडळ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
३. सदस्य, महाविद्यालय मान्यता समिती, एन.सी.टी.ई., नवी दिल्ली
४. अध्यक्ष, स्थानिक चौकशी समिती, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
५. शासन प्रतिनिधी, प्राचार्य, प्राध्यापक, ग्रंथपाल निवड समिती, संत गाडगे बाबा अमरावती

विद्यापीठ, अमरावती

६. कुलगुरु प्रतिनिधी,प्राचार्य, प्राध्यापक, ग्रंथपाल निवड समिती, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**मार्गदर्शक**

१. पी.एच.डी. मार्गदर्शक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

२. पी.एच.डी. मार्गदर्शक, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, जि. नागपूर

परिक्षक

१. पी.एच.डी. परीक्षक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

२. पी.एच.डी. परीक्षक, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड

* * * *

## प्रा.डॉ. वसुधा देव

१) एलआरटी कॉमर्स कॉलेजमध्ये व्यक्तिमत्व विकास या विषयावर व्याख्यान.

२) राष्ट्रसेविका समिती विजयादशमी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथीपद.

३) दत्तमंदिर अकोला येथे 'आत्मषटकम्' या विषयावर तीन दिवसीय प्रवचन मालिका.

४) फेसबुकच्या माध्यमातून खालील एकूण ३०० ले व ६ ई-बुक प्रकाशनाच्या मार्गावर.

१. दुर्वांकुर

२. स्वव्यवस्थापन कौशल्य

३. Problem? shoot

४. सदाफुली

५. True love

६. आईबाबा! तुम्हीच माझे कौन्सिलर व्हा !

५) विवेकानंद जयंतीनिमित्त अखिल भारतीय ग्राहक पंचायत अकोलाच्या वतीने जाहीर व्याख्यान.

६) understanding the sell या विषयावर एकूण 12 व्याख्याने youtube वर upload. vasudhadeo हे YOUTUBE CHANELL वर अपलोड केले.

७) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीच्या माध्यमातून स्वामी चिन्मयानंद व मानवसंसाधन या विषयावरील जागतिक स्तरावरतील पहिली पी.एचडी., विद्यार्थिनीचे नाव डॉ. स्मिता जोगळेकर. मार्गदर्शक डॉ.सौ. वसुधा देव व डॉ. प्रदीप अवचार यांची 'कैदी बांधवांची मुलांचे समायोजन' या आगळ्या वेगळ्या विषयावर पी.एचडी व सौ. नीता देशमुख यांचा पी.एचडी. अहवाल विद्यापीठात सादर

८) श्री. विनोद महल्ले यांच्या 'दर्पण' या काव्यसंग्रहास प्रस्तावना.

* * * *

## डॉ. नूतन भानुदास चव्हाण

१. दि.१४.६.२०१७ बदलीने महाविद्यालयात रुजू.

२. दि. ३.७.२०१७ मुंबई विद्यापीठात एन.सी.टी.ई. ओपन हाऊस सेशनमध्ये सक्रिय सहभाग.

३. पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत एका विद्यार्थी संशोधकाला आचार्य पदवी प्राप्त, चार विद्यार्थी संशोधकांना मार्गदर्शन केले, त्यांचे प्रबंध विद्यापीठाला सादर केले.

४. पीएच.डी. संशोधक मार्गदर्शक म्हणून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांची मान्यता.

५. दि. २८ ते ३० डिसेंबर २०१७ दरम्यान जाधवपूर विद्यापीठ, कलकत्ता (पश्चिम

बंगाल) येथे आयोजित भारतीय इतिहास परिषदेत Gandhi & Ambedkar war – Causes & concequences या विषयावरील शोधनिबंधाचे वाचन केले.

६. दि. ८.२.२०१८ स्व. न. बो. महाविद्यालय तेल्हार, जि. अकोला येथे बी.एड. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी बाह्य परीक्षक म्हणून कार्य.

* * * *

**डॉ. आशा म. धारस्कर–भावसार**

१. दि. १२ जानेवारी, २०१७ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, भंडारा येथे स्वामी विवेकानंद व माँ जिजाऊ जन्मदिवसानिमित्य 'युवादिन' कार्यक्रमाचे आयोजन व कार्यक्रम समन्वयक म्हणून उपस्थिती.

२. दि. १६ व १७ जानेवारी, २०१७ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, भंडारा येथे 'शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळेचे' आयोजन

३. दि. ३०/१/२०१७ रोजी महात्मा गांधी पुण्यतिथी व हुतात्मा दिना निमित्य कार्यक्रमाचे आयोजन

४. दि. २५ जानेवारी, २०१७ रोजी शासकीय अध्यापक माहविद्यालय, भंडारा येथे 'सुत्रसंचालन' कार्यशाळेचे आयोजन व समन्वयक.

५. शिवाजी महाराज जयंती निमीत्य दि. २० फेब्रुवारी, २०१७ रोजी शिवजयंती उत्सव कार्यक्रमाचे आयोजन.

६. दि. २० ते २३ फेब्रुवारी, २०१७ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय भंडारा येथील स्नेहसंमेलनात सांस्कृतिक प्रभारी म्हणून कार्य.

७. दि. ११ जानेवारी, २०१७ रोजी सामाजिक न्याय विभागातर्फे तहसील कार्यालय, भंडारा येथे राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्याच्या दृष्टिने आयोजित सहविचार सभेला उपस्थिती.

८. दि. २५ जानेवारी २०१७ रोजी 'राष्ट्रीय मतदार दिवस' या राष्ट्रीय कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन व समन्वयक.

९. कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवसानिमीत्य दि. २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी 'मराठी राजभाषा दिन' कार्यक्रमाचे आयोजन.

१०. सिताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला तर्फे आयोजित 'भारतीय महिला : काल आज आणि उद्या' या विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राला दि. २४ डिसेंबर, २०१७ रोजी उपस्थिती.

११. दि, २४ डिसेंबर, २०१६ रोजी 'स्त्री शिक्षणात समाज परिवर्तकांची भूमिका' या विषयावरील शोधनिबंधाचे राष्ट्रीय चर्चासत्रात सादरीकरण.

१२. दि. २५ व २६ फेब्रुवारी, २०१७ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, भंडारा येथे आयोजीत दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात सक्रिय सहभाग.

१३. 'ज्ञानरचनावाद:अध्ययन, अध्यापन व शिक्षकांची भूमिका' या विषयावरील शोधनिबंधाचे राष्ट्रीय चर्चासत्रात वाचन.

१४. दि. ११ ते १६ डिसेंबर, २०१७ या कालावधीत बी.एड. प्रशिक्षणार्थींसाठी 'पालक-शिक्षक संघटना' कार्यशाळेचे आयोजन व समन्वयक

१५. दि. १९ डिसेंबर, २०१७ रोजी ज्युबिली हायस्कुल, अकोला येथे पालक शिक्षक मेळाव्यात सहभाग.

१६. महाराष्ट्र शासनातर्फे आयोजित 'मोर्णा नदी स्वच्छता अभियान' या राष्ट्रीय कार्यात सक्रीय सहभाग.

१७. दि. १०.२.२०१८ रोजी बी.एड्. प्रशिक्षणार्थींसाठी सामाजिक उपक्रमांतर्गत 'स्वच्छता अभियान' उपक्रमाचे आयोजन व नियोजन 'मोर्णानदी स्वच्छता मोहिम' चे समन्वयक म्हणून कार्य.

१८. 'विद्यावार्ता' Issue 21, Vol. 04 जानेवारी ते मार्च २०१८ या आंतरराष्ट्रीय स्तरावरील आंतरविद्याशाखीय संशोधन नियतकालीकात 'आश्रमशाळेत शिकणाऱ्या इयत्ता ८ वी तील आदिवासी विद्यार्थ्यांच्या बोलीभाषेचा शैक्षणिक संपादनुकीवर होणाऱ्या परिणामांचा चिकीत्सक अभ्यास' या विषयावरील शोधनिबंध प्रकाशित.

१९. दि १७ फेब्रुवारी, २०१८ रोजी Center for Humanities and cultural studies, kalyan (w), Dist. Thane तर्फे आयोजित एक दिवसीय आंतर विद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभाग.

****

**प्रा. डॉ. नीलिमा अरविंद मोरे**

१. दि. २५.९.२०१६ रोजी मोहिंदरसिंग कबाल सिंग डिग्री कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कल्याण येथे इंटरडिसिप्लिनरी राष्ट्रीय परिसंवादामध्ये संशोधन पेपरचे वाचन – 'बी.एड. छात्राध्यापकांच्या फॅमिनिझम' बद्दलच्या दृष्टिकोनाचा अभ्यास.

२. दि.२० व २१ ऑक्टोबर २०१६ रोजी य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक यांनी आयोजित केलेल्या मूल्यशिक्षण राज्यस्तरीय समंत्रक प्रशिक्षणास उपस्थित.

३. २३ डिसेंबर २०१६ शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिसंवादामध्ये 'प्राथमिक स्तरावरील सहावीच्या विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाचे अध्ययन करताना येणाऱ्या समस्यांवरील उपाययोजनांचा अभ्यास' संशोधन पेपरचे वाचन केले.

४. दि. २३.१२.२०१६ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे 'न्यू ट्रेन्ड्स इन एज्युकेशन' या विषयावर आधारित राष्ट्रीय परिषदेस उपस्थित.

५. १६ जानेवारी २०१७ रोजी पी.आर. पाटील कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड.) अमरावती येथे विद्यापीठ संलग्निकरण वाढीकरीता चौकशी समितीचे सदस्य म्हणून पूर्णवेळ उपस्थित.

६. दि. २५ जानेवारी २०१७ रोजी आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालय, अकोला यांनी आयोजित केलेल्या conserve nature for bright future या विषयावर आधारित स्थानिक स्तरीय कार्यशाळेत समन्वयक म्हणून काम केले.

७. जानेवारी-मार्च २०१७ International Journal of Social & Scientific Research. अप Indexed International Multidisciplinary Quarterly Journal, "Relation of Teacher Education Programme with total Education Programme" लेख प्रकाशित. आयएसएसएन – २४५४३१८७

८. दि. २७ व २८ जानेवारी २०१७ PDVT College of Education for Womens , S.N.D.T. Women's University, Mumbai येथे 'विज्ञान अध्यापनात प्रश्नपद्धतीचा वापर : एक कला' या पेपरचे वाचन केले.

९. दि. ३.२.२०१७ रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे स्थानिक स्तरावरील कार्यशाळेच्या आयोजनास उपस्थिती. विषय :- 'भाषा आणि सामाजिक शास्त्रांच्या अध्यापन व संशोधनात लिंगभाव सकल्पनेचे उपयोजन'

१०. दि. २६ व २७.३.२०१७ रोजी गोखले एज्युकेशन सोसायटी कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च, गोखले सोसायटी लेन, परेल, मुंबई येथे राष्ट्रीय परिसंवादात 'पनवेल मधील माध्यमिक शाळेतील शिक्षकांना लैंगिक शिक्षण देताना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास' संशोधनपर पेपरचे वाचन केले.

११. दि. १५ मार्च ते २१ मार्च २०१७ या कालावधीत RUSA Sponsored Human Resource Development Centre University of Mumbai 'Gender and Culture' short term course साठी उपस्थिती

१२ दि. २८ एप्रिल २०१७ रोजी श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा येथे श्री. अशोक एस. जाधव यांच्या प्लेसमेंटसाठी सहसंचालक नॉमिनी म्हणून उपस्थित.

१३. दि. २५ सप्टेंबर २०१८ एच.जी.एम. आझन कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणे येथे राष्ट्रीय परिषदेमध्ये 'विज्ञान आणि भाषा' लेख प्रकाशित.

१४. दि. १३.५.२०१७ रोजी व्हिव्हा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी शिरगाव कुंभारपाडा वीर सावरकर रोड विरार, ईस्ट ठाणे, महाराष्ट्र येथे बी.एड. सीईटी ऑनलाईन परीक्षेसाठी अधिकृत अधिकारी म्हणून उपस्थिती.

१५. दि. २०.५.२०१७ रोजी स्वामी सिद्धी कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च स्वामी सिद्धी कॅम्पस, साईबाबा मंदिराजवळ, ठाणे येथे लॉ सीईटी परीक्षेस अधिकृत अधिकारी म्हणून उपस्थित.

१६. दि.२८.५.२०१७ रोजी श्री. हावरे सेंचुरियन कॉम्प्लेक्स, सेक्टर १७, रेल्वे स्टेशन जवळ, नवी मुंबई येथे एम.एड. ऑनलाईन सी.ई.टी. परीक्षेस अधिकृत अधिकारी म्हणून उपस्थित.

१७. दि. १४ जून २०१७ रोजी य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे 'लिंग, शाळा आणि समाज' तसेच 'समकालीन भारत आणि शिक्षण' या विषयावरील प्रत्येकी एका घटकासाठी पुस्तक लिखाण कार्य केले.

१८. दि. ३/७/२०१७ मुंबई विद्यापीठात एन.सी.टी.ई. ओपन हाऊस सेशनमधे सक्रिय सहभाग.

१९. दि. २४.८.२०१७ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय अकोला येथे ग्रंथपाल वर्ग-३, शारीरिक शिक्षक निदेशक (योगशिक्षक), फाईन आर्ट शिक्षक व परफॉर्मिंग आर्ट शिक्षक या विषयाच्या रिक्त पदाकरिता मुलाखतीसाठी मागासवर्गीय प्रतिनिधी म्हणून उपस्थित.

२० दि. २२ फेब्रुवारी २०१७ रोजी आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदेमध्ये 'इंटरनॅशनल हायर एज्युकेशन इन इंडिया अँड न्यू एज्युकेशन पॉलिसीज' या पेपरचे वाचन. स्थळ :- सेवा सदन कॉलेज ऑफ एज्युकेशन, उल्हासनगर, ठाणे.

२१. दि. २५ व २६ फेब्रुवारी २०१७ शासकीय अध्यापक महाविद्यालय, भंडारा येथे राष्ट्रीय स्तरावरील परिषदेत 'ज्ञानरचनावादी वर्गामध्ये शिक्षकांची भूमिका' या विषयावर पेपरचे वाचन.

२२. दि. २४.४.२०१७ रोजी श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा (लाड) येथील प्रा. ए.एस. जाधव यांच्या स्थान निश्चितीसाठी शासन प्रतिनिधी म्हणून उपस्थित.

२३. दि. ८ एप्रिल २०१७ रोजी कला महाविद्यालय, मलकापूर येथे नॅक पूर्वतयारी व नियोजन या विषयावर जिल्हास्तरीय कार्यशाळेमध्ये उपस्थित.

२४. दि. १२, १३, १४ एप्रिल २०१७ रोजी एच. बी. बी.एड. कॉलेज, वाशी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक न्याय' या विषयावर पेपरचे वाचन.

२५. दि. ७ ऑक्टोबर २०१७ रोजी गुरुनानक कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च, भांडुप, (प) येथे 'ई-पोर्टफोलिओ : अ पाथवे टू प्रोफेशनल डेव्हलपमेंट' जिल्हास्तरीय कार्यशाळेमध्ये उपस्थित.

२६. दि. २० डिसेंबर २०१७ स्वावलंबी शिक्षण महाविद्यालय, वर्धा येथे य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक यांनी आयोजित केलेल्या बी.एड. शिक्षणक्रम मूल्यमापन कार्यशाळेमध्ये उपस्थित.

२७. दि. १२ जानेवारी २०१८ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे राष्ट्रीय स्तरावरील परिषदेमध्ये पेपरचे वाचन. विषय :- 'शिक्षक अभिवृत्ती विकास' आणि दुपारच्या सत्रामध्ये चेअर पर्सन म्हणून उपस्थित.

२८. दि. २३.९.२०१७ रोजी प्राचार्य, पोलिस प्रशिक्षण केंद्र, अकोला यांचे कार्यालयामध्ये प्रभावी अध्यापन कसे असावे? या विषयावर व्याख्यान दिले.

२९. दि. १३.१२.२०१७ रोजी रिसर्च जर्नल 'बिकन' (आयएसएसएन २३१९-९९६२) साठी पिअर रिव्हीव कमिटी मेंबर म्हणून शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेलच्या प्राचार्या यांनी निवड केली.

३०. दि. २ ऑगस्ट २०१६ रोजी आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील प्रा.डॉ.प्रदीप पी. देवहाते, रसायनशास्त्र विभाग, यांच्या स्थाननिश्चितीसाठी शासन प्रतिनिधी म्हणून उपस्थित.

३१. दि. ८.९.२०१६ रोजी यशवंतराव चव्हाण आर्ट्स अँड सायन्स महाविद्यालय, मूर्तिजापूर येथील प्रा. गणेश पुंडलिकराव खंडारे यांच्या स्थाननिश्चितीसाठी शासन प्रतिनिधी म्हणून उपस्थित.

३२. दि. ५.३.२०१८ ते दि. ९.३.२०१८ यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी(यशदा), पुणे येथे उजळणी प्रशिक्षण कार्यक्रम वर्ग साठी उपस्थित.

* * * *

### डॉ. अ.ग. वातकर

१) दि. १४ जून २०१७ -यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, मध्ये 'जेंडर स्कूल अँड सोसायटी' या विषयासाठी आयोजित कार्यशाळेत पाठ्यक्रम विकसन समिती सदस्य म्हणून उपस्थित.

२. दि. १९ जून २०१७ - कला महाविद्यालय मलकापूर येथे सहा. प्राध्यापक स्थान निश्चितीकरण समितीत सहाय्यक संचालक प्रतिनिधी म्हणून उपस्थित.

३. दि. ३ जुलै २०१७ - जिल्हा नियोजन समिती सभा, उपस्थिती.

४) दि. ३ व ४ जुलै २०१७ - माजी विद्यार्थी संघटनेतर्फे 'महाटीईटी' मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन.

५) दि. १० व ११ जुलै २०१७ - माजी विद्यार्थी संघटनेतर्फे 'टीईटी' मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन.

६) दि. २९ जुलै २०१७ - संत गाडगेमहाराज कला व वाणिज्य महाविद्यालय मूर्तिजापूर येथे स्थाननिश्चिती समितीत सहाय्यक संचालक प्रतिनिधी म्हणून उपस्थिती.

७) ११ ऑगस्ट २०१७ - सकाळ वृत्तपत्राद्वारे आयोजित (वायआयएन) नेतृत्व विकास कार्यक्रमात मतदान केंद्राधिकारी म्हणून उपस्थित.

८) १४ ऑगस्ट २०१७ – श्री गाडगेमहाराज कला व वाणिज्य महाविद्यालय, मूर्तिजापूर येथे स्थाननिश्चिती समितीत सहाय्यक संचालक प्रतिनिधी म्हणून उपस्थित.

९) २१ ऑगस्ट ते १८ नोव्हेंबर २०१७ – प्राचार्यपदाचा तात्कालिक प्रभार.

१०) ४ सप्टेंबर २०१७ – खंडेलवाल महाविद्यालय अकोला येथे स्थाननिश्चिती समितीत सहाय्यक संचालक म्हणून उपस्थिती.

११) १२.९.२०१७ –: राऊत कला, वाणिज्य महाविद्यालय, वनोजा येथे सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांचे प्रतिनिधी म्हणून स्थाननिश्चीती समितीत उपस्थीत.

१२) २२.९.२०१७ गुलाम नबी आझाद कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, बार्शिटाकळी सहाय्यक प्राध्यापक पदाच्या मुलाखतीकरिता शासन प्रतिनिधी म्हणून उपस्थिती.

१३)१४.१०.२०१७ म. गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे आयोजित गांधी विचार संस्कार परीक्षेचे आयोजन.

१५) ९.११.२०१७ संचालक कार्यालय, पुणे येथे प्राचार्य सभेसाठी उपस्थित.

१६) ७.१२.२०१७ के.एन.जी. कला व वाणिय महाविद्यालय, कारंजा लाड येथे सहसंचालक प्रतिनिधी म्हणून स्थाननिश्चिती समितीत उपस्थित.

१७) दि. २३ जोनवारी ते २४ जानेबारी २०१८ नियमीत शिक्षण स्नातक २०१८-१९ साठी अंतर्गत परीक्षक म्हणून कार्य

१८) ५.२.२०१८ ते ६.२.२०१८ शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलढाणा येथे अंतिम पाठ परीक्षा बाह्य परीक्षक म्हणून उपस्थित.

१९) दि. ९.३.२०१८ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बार्शिटाकळी येथे प्राध्यापकांच्या स्थान निश्चितीकरीता सहसंचालक अमरावती विभाग, अमरावती येथे प्रतिनिधी म्हणून उपस्थित

२०. गुरुवर्य गौरवग्रंथ या ISBN 978-93-84801-09-0ग्रंथकेच्या पुस्तकात प्रभावशाली व्यक्तिमत्व हा लेख प्रसिध्द.

* * * *

**प्राध्यापक प्रबोधिनी – डॉ. संध्या सामुद्रे**

१. दि. १२ जानेवारी व १३ जानेवारी २०१७ दरम्यान श्रीमती नर्मदाबाई बोडखे अध्यापक महाविद्यालय, तेल्हारा, जि. अकोला येथे बी.एड. अंतिम पाठ परीक्षा घेण्यासाठी बाह्य परीक्षक.

२. दि.२३ जानेवारी व २४ जानेवारी २०१७ दरम्यान शासकीय अध्यापक महाविद्यालय अकोला येथे बी.एड. अंतिम पाठ परीक्षा घेण्यासाठी अंतर्गक परीक्षक.

३. दि. ७ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी २०१७ दरम्यान 'ज्ञानरचनावादावर आधारित शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा' समन्वयक या नात्याने कार्यशाळेचे आयोजन व प्रदर्शनीचे आयोजन.

४. दि.२४ व २५ फेब्रुवारी २०१७ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, भंडारा येथे संपन्न झालेल्या constructivism in Eduacation या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात प्रकाशित झालेल या आय.एस.बी.एन. प्राप्त विशेषांकामध्ये 'वर्ग अध्यापनात ज्ञानरचनावादाच्या उपयोजनात शिक्षकाची भूमिका : एक सर्वेक्षण' हा शोधनिबंध प्रकाशित.

५. जानेवारी– मार्च २०१७ च्या विद्यावार्ता या आय.एस.एस.एन. प्राप्त 'विद्यावार्ता खंड १७ भाग ६ वा' या नियतकालिकामध्ये "A comparative study of Job Satisfaction &

Teaching Effectiveness among secondary school teachers in Akola city" हा शोधनिबंध प्रकाशित.

६. दि. २२ मार्च २०१७ रोजी प्लेसमेंट सेलअंतर्गत "The Chikhali Urban Vidyaniketan, Chikhali" या शाळेसाठी Campus Interview चे संपूर्ण आयोजन. एकूण २९ विद्यार्थ्यांची मुलाखतीसाठी उपस्थिती.

७. दि. २३ मार्च २०१७ रोजी प्लेसमेंट सेल अंतर्गत School of Scholars, Akola या शाळेसाठी Campus Interview चे संपूर्ण आयोजन. एकूण २६ विद्यार्थी मुलाखतीसाठी उपस्थित.

८. दि. २३ मार्च २०१७ रोजी प्लेसमेंट सेल अंतर्गत Sunrise English School, Risod या शाळेसाठी Campus Interview चे संपूर्ण आयोजन. एकूण २२ विद्यार्थी मुलाखतीसाठी उपस्थित.

९. दि. २५ एप्रिल २०१७ रोजी डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालय, गाडेगाव (तेल्हारा) जि. अकोला येथे प्राध्यापकासाठी स्थाननिश्चिती समिती अंतर्गत शासन प्रतिनिधी म्हणून उपस्थिती व कार्य.

१०. जून २०१७ च्या भारतीय शिक्षण या आय.एस.एस.एन. प्राप्त मासिकामध्ये 'माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची व्यावसायिक मूल्ये आणि अध्यापन परिणामकारकता यातील संबंधाचा अभ्यास' हा शोधनिबंध प्रकाशित.

११. दि.१४ जून २०१७ रोजी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे 'लिंग, समाज आणि शाळा' या विषयाबाबत अभ्यासक्रम विकसन समिती सदस्य सभेस उपस्थित.

१२. दि. २१ जून २०१७ रोजी ज्युबिली इंग्लिश हायस्कूल, अकोला येथे माहिती संप्रेषण तंत्रविज्ञान व शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळेंतर्गत 'माहिती संप्रेषण तंत्रविज्ञान व शिक्षकाची भूमिका' या विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शक.

१३. दि. २१ जुलै २०१७ रोजी मनुताई कन्या शाळा, अकोला येथे कै. मनुताई बापट पुण्यतिथी कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी.

१४. दि. २८ सप्टेंबर २०१७ रोजी प्रादेशिक पोलिस प्रशिक्षण शाळा, अकोला येथे राज्यातील पोलिस अधिकरी प्रशिक्षण कार्यशाळेत 'शिक्षक-विद्यार्थी आंतरक्रियेचे स्वरूप, आवश्यक बाबी व प्रशिक्षक-प्रशिक्षणार्थी संबंध' या विषयासाठी तज्ज्ञ मार्गदर्शक.

१५. शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला अंतर्गत बी.एड. प्रवेश २०१६-१८ समितीमध्ये सदस्य या नात्याने उपस्थिती व कार्य.

१६. दि. १ फेब्रुवारी व २ फेब्रुवारी २०१८ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय येथे बी.एड. अंतिम पाठ परीक्षा घेण्यासाठी अंतर्गत परीक्षक.

१७. दि. ७ मार्च २०१८ रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे 'बी.एड. अभ्यासक्रम पुनर्रचना' कार्यशाळेत सक्रिय सहभाग

१८. दि. ८ मार्च, २०१८ रोजी School of Scholars येथे 'जागतीक महिला दिन' कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी.

१९. जळगांव आकाशवाणीवर 'रे जीवन' या विषयावर ३५ भांगची मालिकेचे प्रसारण.

२०. अकोला आकशवाणीवर शब्दलेक कार्यक्रमात विविध विषयावर भाषणांचे प्रसारण.

* * * *




# अशी पाखरे येती.....




**आरती अच्युतराव जोशी**
तोष्णीवाल ले-आऊट,
अमरावती रोड, अकोला
मो. ८२३७७३७१३४



**रोहित पांडुरंग हिवरकर**
महानगर, शिवणी,
पो. कृषी नगर, ता.जि. अकोला
मो. ८८८८४१४२४६



**ज्ञानेश्वर नारायण ताले**
मु.पो. चान्नी, ता. पातुर,
जि. अकोला
मो. ७३८७१२३७९९



**कु. शिरीन नाज अब्दुल जमीर**
मुज्जफर नगर. लकडगंज,
अकोला
मो. ८७९३३०९५८२



**कु. प्राजक्ता सदाशिव शेळके**
मित्र सोसायटी, केशव नगर,
कौलखेड, अकोला
मो. ९८६०९५९४०१




**श्रीकृष्ण उखर्डा क्षिसरसागर**
रा. मांडका. ता. खामगांव,
जि. बुलढाणा
मो. ८८०५३४६२०८



**कु. स्नेहल छगनराव होनाळे**
मित्र हाऊसिंग सोसायटी,
केशव नगर, अकोला
मो. ९०२१८६७०५५




**कु. नेहा सुरेश वानखडे**
प्रगती नगर, कौलखेड, अकोला
मो. ९५६१६७१९९८



**नमिता प्रमोद मुळतकर**
तापडिया नगर, शांती सदर,
अकोला
मो. ९१५८५६८३९३६



**कु. दिपाली किसन बावस्कार**
शिवकिसनदास नगर,
जळगांव (जामोद), जि. बुलढाणा
मो. ८५५१९१७१०३


शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला
२०१६-२०१७
शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला